म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : नाटक
दा. क्र. : 20003

# आणखी चार एकांकिका

IRBK-0120003

# आणखी चार एकांकिका

शं. ना. नवरे

IRBK-0120003

मॅजेस्टिक बुक स्टॉल,

यांपैकी कुठल्याही एकांकिकेचा प्रयोग करण्यापूर्वी प्रयोगमूल्य म्हणून रुपये चाळीस मात्र मनीऑर्डरने सौ. अंजली नवरे, 'सौमित्र', डोंबिवली, (पश्चिम), (जि. ठाणे) ४२१२०२ यांच्या नावे पाठवून त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगीशिवाय प्रयोग करणाऱ्या व्यक्तीवर अथवा संस्थेवर कायदेशीर इलाज केला जाईल.

मूल्य : सात रुपये

© शं. ना. नवरे ● पहिली आवृत्ती : नोव्हेंबर '६९
दुसरी आवृत्ती : एप्रिल '७९

* मुद्रक : अ. के. कोठावळे, ॐ मुद्रणालय, २५० अ, शनिवार पेठ, पुणे ३०.
* प्रकाशक : केशव विष्णु कोठावळे, मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगाव नाका, मुंबई ४.

एक नाटकवेडा मित्र
प्रभाकर मोने यास
सप्रेम

—शन्ना

- डाग
- मार्ग
- काला पहाड़
- रीव्हेंज

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 20003 नों. दि 20/2/53.
वि. नाटक

# १. डाग

[ दिवाणखाना. सुशोभित. चांगल्या रुबाबदार मालकाला शोभणारा. वेळ : सकाळी आठ–साडेआठाची. मोठा भाऊ एका खुर्चीवर बसला आहे. शून्य मनाने. बाजूला वर्तमानपत्र पडले आहे. प्रेक्षकांना दिसेल अशा तऱ्हेने. दाराची बेल वाजते. एकदा... दोनदा. मोठ्या भावाचे लक्ष नाही. अजून नजर शून्यात. पुन्हा बेल वाजते. खणखणून. मोठा भाऊ दचकतो. स्वतःला सावरतो. वर्तमानपत्र नीट करून टेबलाच्या ड्रॉवरमध्ये ठेवतो. पुढे जाऊन दार उघडतो. दारात धाकटा भाऊ उभा आहे. रंगीबेरंगी जुन्या कपड्यांत. चेहऱ्यावर बेफिकिरी. मोठा भाऊ अस्पष्ट सुस्कारा टाकतो. थंडपणे येऊन पुन्हा खुर्चीवर बसतो. ]

धाकटा भाऊ : येऊ ना आत?

मोठा भाऊ : अं?

धाकटा : नाही, विचारलं की आत येऊ ना?

मोठा : ये ना... बस. असा परक्यासारखा प्रश्न का विचारलास?

धाकटा : ( बसत नाही. सगळीकडे बघतो. मग मोठ्या भावाच्या चेहेऱ्याकडे बघतो. ) तुझा हा रुबाब पाहिला की वाटतं, तुझा धाकटा भाऊ म्हणून मी शोभत नाही. मग ओठावर असा— या रुबाबाला साजेसा— प्रश्न उभा राहतो : आत येऊ ना ?

मोठा : हं !

धाकटा : आज किती वर्षांनी भेटतो आहोत आपण ?

मोठा : काही कल्पना नाही. तरी झाली असतील सातएक वर्षं !

धाकटा : हो. सात वर्षं तर नक्कीच. मला शिक्षा झाली, तेव्हा कोर्टाबाहेर भेटला होतास. दोन वर्षांची शिक्षा संपून मध्ये पाच वर्षं गेली. या पाच वर्षांत पुन्हा दोन खेपा झाल्या.

मोठा : कुठं ? इथं येऊन गेलास दोनदा ?

धाकटा : छे छे ! तुरुंगात. ( हसतो. ) तुरुंग म्हटलं की तुम्हा शिकलेल्या लोकांना जरा हेच वाटत असेल, नाही ?

मोठा : अं ?

धाकटा : मग धाकट्या भावाला भेटायलासुद्धा तुम्हांला भीती वाटते.

मोठा : कसली ?

धाकटा : तुरुंगाची... तुरुंगात मला वाटायचं, तू कधीतरी येशील ! म्हणजे मला भेटायला ! लहानपणी खूप जीव होता तुझा माझ्यावर— अगदी भावासारखा !

मोठा : ( दचकतो. ) भावासारखा म्हणजे ?

धाकटा : म्हणजे भावानं भावावर लावावा तसा ! ( हसतो. ) हं... तर आपली सात वर्षांनी भेट होतेय.

मोठा : आज माझ्याकडे येण्याचं कारण ?...बस ना. ( धाकटा खुर्चीवर बसतो.) चहा घेणार ?

धाकटा : नको... पाणी घेईन फक्त... ( मोठा भाऊ पाणी देतो. ) तू केव्हा जाणार अमेरिकेला ?

मोठा : अमेरिकेला—

धाकटा : हो. म्हणजे नक्की झालं ना आता ? लग्न करूनच जाणार असशील !

मोठा : तुला कसं कळलं ?

धाकटा : कळलं! अशा गोष्टी लपून राहात नाहीत, नाही?... तुझे सासरे रावसाहेब देशपांडे—

मोठा : देशपांडे नाहीत, देशमुख!

धाकटा : (दचकतो.) असतील. मी गडबडीतच नाव वाचलं त्यांचं!

मोठा : वाचलं म्हणजे? कुठं छापून आलंय्?

धाकटा : (फक्त हसतो.) हं... तर रावसाहेब देशमुखांची सुविद्य कन्या तुला मिळणार आहे. त्यांना चांगल्या उत्तम, नामांकित घराण्यातला सुशिक्षित, हुशार जावई हवा होता. तसा तू आहेस. आपल्या पैशांनी तुला ते अमेरिकेला पाठविणार आहेत. मला सगळं ठाऊक आहे... खूप आनंद झालाय् मला.

मोठा : पण—

धाकटा : पण काय? आता तर काहीच अडचण नाही ना?

मोठा : तुझं बोलणं मला समजत नाही! तू हेच विचारायला आला आहेस की—

धाकटा : छेः छेः! मी दुसऱ्याच कामासाठी आलोय्. तुझं चांगलं झालेलं ऐकायचं, तुला मिठी मारून गदगदून हलवायचं— ते पूर्वी होतं सगळं. मी चांगला होतो तेव्हा! आता मी येतो तो काही भानगड असली म्हणजे- खरं की नाही? (हसतो.)

मोठा : कसली भानगड?

धाकटा : अरे खरंच! ती सांगायचीच राहिली. मी आपला वेड्यासारखा धरून चाललो, की तुला सगळं ठाऊक आहे!... माझ्या हातून भयंकर गुन्हा घडलाय्.

मोठा : गुन्हा?

धाकटा : हो. भयंकर आहे. फार भयंकर. अशा गुन्ह्यांना एकच सजा असते, —फाशी–जीव जाईपर्यंत फाशी!

मोठा : म्हणजे तू खूनबिन-?

धाकटा : हो, मी खून केलाय्!

मोठा : खून ?

धाकटा : सांगितलं ना एकदा!... आणि तू कशाला दचकतो आहेस एवढा? च्यायला, खून मी केला आणि दचकतोस तू?

मोठा : स्टॉप इट! चांगली भाषा नाही वापरता येत?

धाकटा : ( हसतो ) सॉरी ! अरे, माझी मित्रमंडळी म्हणजे असलीच आहे. आमचा भानू हातभट्टी चालवतो. बच्चूचा अड्डा आहे जुगाराचा. मी बेटिंग घेतो. आता तर म्हणा मी ए ग्रेडमध्ये गेलोय्. मर्डर ! खून ! ( हसतो. )

मोठा : खूनबिन असलं काही मोठ्यानं बडबडू नकोस इथं. ( संथपणे ) हे बघ, इथं स्वस्थ बस. काय झालं ते सांग. आपण मार्ग काढू काहीतरी. चहा–कॉफी काही घेशील ?— हसू नकोस रे ! केवढं संकट आलंय् हे, तुला कल्पना नाही.

धाकटा : आज खून म्हटल्यावर एवढा कसा पुळका आला तुला ? मागं नुसती चोरी केली तर तू केवढा संतापला होतास ! आपल्या घराण्याची प्रतिष्ठा मला तू पुन्हा पुन्हा ऐकवली होतीस आणि तुझं बरोबरच होतं रे ! पण तुरुंगात मला वाटे, तेव्हा त्या पहिल्या गुन्ह्याच्या वेळी तू मला पोटाशी घेतलं असतंस तर ते आपल्या घराण्याला अधिक शोभून दिसलं असतं. मला तू संधी द्यायला हवी होतीस सुधारायची ! पण मला तुरुंगाच्या ताब्यात देऊन तू निघूनच गेलास. खूप दूर. तुझ्या–माझ्यातली तुरुंगाची भिंत हळूहळू वर जात होती, ती मला दिसत होती आणि तुला दिसत नव्हती. मनात येई, वडलांची इस्टेट एकट्याला मिळावी म्हणून तू मला खालीखालीच लोटत असशील !

मोठा : तसं नाही रे !

धाकटा : ( अजून स्वतःशीच ) असा विचार मनात आला, की मला केवढी शरम वाटायची ! पण तू तुरुंगातदेखील कधी भेटायला आला नाहीस. मोठमोठ्या गुन्हेगारांच्या रक्ताची माणसं त्यांना भेटायला यायची, आणि मी मात्र एकटाच त्या भेटायला आलेल्या माणसांत तुझी मूर्ती आठवून डोळे ओले करायचा... ( आवाज कोरडा. चढलेला. ) आणि आज मी खुनी ठरलोय् ! खुनी ! रक्तानं माझे हात माखले आहेत.

मोठा : शू ऽ ऽ ! हळू–हळू बोल रे !... हे पाणी पी ... मला सगळं नीट सांग. कुणाचा खून केला आहेस तू ?

धाकटा : आजच्या वर्तमानपत्रात वाचलं नाहीस ?

मोठा : ( दचकतो. लपवलेल्या वर्तमानपत्राच्या दिशेने जातो. ) काय ?

धाकटा : जुहू बीचवर एका अज्ञात इसमाचा खून—

मोठा : जुहू बीचवर ? —पण—पण—

धाकटा : वाचलं असशीलच तू ! वाचलं आहेस ना ? (मोठा भाऊ गंभीर. गप्प.) 'हो' म्हण की ! वाचल्याचं तरी कबूल कर !

मोठा : हो. वाचलंय् मी. पण मला नाही वाटत तू तो खून केला आहेस म्हणून !

धाकटा : का नाही वाटत ?

मोठा : (गप्प.)

धाकटा : सांग ना ! का नाही तसं वाटत ? मी स्वतः सांगतोय् मी खुनी आहे, तरी विश्वास नाही तुझा ?

मोठा : पण वर्तमानपत्रातली बातमी—कदाचित तू म्हणतोयस् तो दुसरा खून असेल. वर्तमानपत्रात म्हटलंय्, एका अज्ञात इसमाचा. पण अज्ञात म्हणजे—

धाकटा : किती गोंधळला आहेस तू ! मी जो खून केला तोच छापून आलाय्. अज्ञात इसम म्हणजे—

मोठा : कोण ?

धाकटा : जबलपूरचा आहे. तू ओळखतोस त्याला.

मोठा : मी ?

धाकटा : आपण जबलपूरला होतो, तेव्हा आपल्या गल्लीत राहायचे त्याचे वडील—सांगू नाव ?

मोठा : कुणाचं ?

धाकटा : खून झालाय् त्याचं—त्याचं नाव रामाधार परदेशी ... बरोबर ?

मोठा : मी कसं सांगणार ? रामाधार परदेशी .. हो ! म्हणजे त्याचे वडील...

धाकटा : हा रामाधार पत्रं लिहीत असे. ब्लॅकमेलिंग. त्याच्या खिशातली पत्रं—

मोठा : त्यांचं काय झालं ? वर्तमानपत्रात त्याबद्दल काही असेल म्हणून वाचलं मी. पण काहीच आलेलं नाही ... खिशात पत्रं असणारच. पत्रं पोलिसांना सापडली म्हणजे—(गोंधळतो.)

धाकटा : म्हणजे खरा खुनी मिळणार ! म्हणून ती पत्रं काढून घेतली आहेत ! (हसतो.)

मोठा : हसायला काय झालं ?

धाकटा : काय झालं ? अरे, पत्रं मी नाही काढून घेतली, माझ्या मित्रानं काढून घेतली. माझ्याकडून.

मोठा : कुठं आहेत ती ?

धाकटा : जाळून टाकली.

मोठा : खरंच ? .. अरे, मग सगळंच सोपं आहे की ! ( जरा खुशीत येऊन ) हा खून केव्हा केलास तू ?

धाकटा : काल रात्री—साडेअकराच्या सुमाराला.

मोठा : तिथं तुम्ही दोघे ठरवून गेला होता ?

धाकटा : हो. त्याचं पत्र होतं मला आलेलं—की जुहू बीचवर साडेअकराला भेट म्हणून. त्याला बरीच रक्कम हवी होती. एकदा वाटलं होतं, तुला आधी भेटून विचारावं पैशाबद्दल. पण एवढे पैसे—

मोठा : एवढे म्हणजे किती ? दहा हजार ?

धाकटा : आकडा बरोबर कसा ओळखलास तू ?

मोठा : ( हसण्याचा प्रयत्न ) अं ? — सहज तोंडात आला तो आकडा सांगितला.

धाकटा : तोंडात आला तो, की डोक्यात होता तो ?

मोठा : ( दचकून ) तुला काय म्हणायचंय् ?

धाकटा : ( प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत ) खिशात पैसे घेण्याऐवजी मी सुरा घेतला. साडेअकराला नेमकं पोचणं मला शक्य नव्हतं—तुझ्यासारखं ! ( मोठा चमकतो. ) तुला टॅक्सीनं जाता येतं. मी बसनं गेलो. नंतर चालत .. मी तिथं पोचलो तेव्हा पावणेबारा होत आले होते.

मोठा : पावणेबारा ? तेव्हा तो होता तिथं ?

धाकटा : कोण ?

मोठा : कोण काय ? ... तो .. तो—ज्याचा तू खून केलास तो !

धाकटा : नाव लक्षात ठेव त्याचं—रामाधार परदेशी ... हं ... मी तिथं गेलो, तर हा रामाधार तिथं होता—पडलेला. मी पुढं गेलो.

मोठा : तो काही बोलला तुझ्याशी ?

धाकटा : ( हसतो. ) तो काय बोलणार ? ( मोठ्याकडे रोखून पाहात ) मी जाऊन सिध्धा खून केला त्याचा. त्याच्या पाठीत सुरा खुपसला.

मोठा : पाठीत की पोटात ? ( उगाच प्रश्न विचारला म्हणून गप्प राहतो. )

धाकटा : असले फालतू प्रश्न कशाला विचारतोयस ? मी रामाधारचा खून केला. परत फिरलो.

मोठा : मग ती खिशातली पत्रं ?

धाकटा : थांब. ऐक ना.—परत आलो, एक चार मिनारचं पाकीट घेतलं, फसाफस सिगारेटी ओढल्या. एक ओढायची, खाली टाकायची. दुसरी पेटवायची, फसाफसा ओढायची, फेकून द्यायची. मग तिसरी—

मोठा : कळलं. पुढं ? लौकर सांग. दहा सिगारेटी संपल्या. मग ?

धाकटा : दहा नाही; सहासात असतील. मी चारपाच ओढल्या, राणेनं दोन ओढल्या.

मोठा : राणे कोण ?... हां ! म्हणजे तो पत्रं घेणारा. हो ना ?

धाकटा : राणे म्हणजे तिथला कॉन्स्टेबल. त्याला नाईट ड्यूटी होती. तो राउंडवर निघाला होता...त्यानंच मला वाटतं, मागाहून खबर दिली मुडद्याची.

मोठा : त्या राणेला...त्याच्याशी तू... म्हणजे त्याला तुझा संशय आला ?

धाकटा : कुणास ठाऊक ! असेलदेखील. कॉन्स्टेबल म्हणजे त्याचा काही नेम नाही. बेरकी जात. असो बिचारी ! राणे वळला. मी सिगारेट पेटवली.ध्यानात आलं, च्यायला पिक्चरसारखं झालं ! पत्रं मुडद्याच्या खिशात.

मोठा : मुडदा मुडदा काय ?

धाकटा : मुडदा नाही तर रामाधार परदेशी म्हणतो. म्हणजे तुला ओळख पटेल ! होय की नाही ?

मोठा : माझ्या ओळखीचा काय संबंध ? बरं, पुढं काय झालं ?

धाकटा : ( हसतो. ) मला गंमत वाटत्येय् ! इतके आपण कधीच बोललो नव्हतो नाही; आजपर्यंत ?–म्हणजे वडील वारल्यापासून. मला वाटत होतं, सगळी भानगड तू ऐकूनच घेणार नाहीस. मला ताबडतोब पोलिसांच्या हवाली करशील. तुझ्या प्रतिष्ठेला धरून होतं ते.

मोठा : नेमकं मुद्द्याचं सांग. मला एक कल्पना सुचत्येय्. यातून आपल्याला निसटता येईल.

धाकटा : आपल्याला ? ( हसतो. ) —हां ! म्हणजे मला. आपल्या घराण्याला. ऑं ?... हां ! तर मुडदा तपासायचा म्हणून ठरवलं आणि परत जुहू बीच-

कडे वळलो.

मोठा : तू जायचं नव्हतंस तिकडे.

धाकटा : का ? तू नसता गेलास ?

मोठा : नसतो गेलो.

धाकटा : पण पत्रं राहिली म्हणून जीव जळत राहिला असता की नाही तुझा ?

मोठा : अर्थातच !

धाकटा : म्हणून मी परत गेलो. मुडदा—नाही, रामाधार परदेशीला उलटा केला. त्याच्या कोटाच्या खिशात हात घातला. खिशातल्या वस्तू बाहेर काढल्या. एक जब्बलपूरपासूनचं तिकीट, पैशांचं पाकीट, पत्रांचा जुडगा, कागदपत्रं, सिगारेटचं पाकीट, माचिस, एक किल्ली—( आठवण करतो ) एक–एक बॉलपेन, एक रुमाल—च्यायला, त्यात एक लवंग होती ! ती मी पटकन् तोंडात टाकली. ( हसतो. ) म्हणजे माझ्या—मुडद्याच्या तोंडात टाकून काय उपयोग ? ( पुन्हा हसतो. )

मोठा : हसू नकोस. त्याचे खिसे सगळे रिकामे केलेस ना ? ( धाकटा भाऊ मान डोलावतो. मोठा भाऊ समाधानाने खिशातून सिगारेट काढून तोंडात धरतो. विचार करून दुसरी सिगारेट धाकट्याला देतो. माचिस शोधू लागतो. धाकटा आपल्या खिशातून माचिस काढून दोन्ही सिगारेटी पेटवतो. समाधानाचे लोट सुटतात.) खिसे रिकामे केलेस ते छान झालं. आता माझा जीव भांड्यात पडला. अरे, आपलं घराणं फार मोठं आहे. आपल्या घराण्याकडून खुनासारखं कृत्य व्हावं हे योग्य नाही. व्हॉट् अ रिलीफ् आय् हॅड् ! ( सिगारेट ओढतो. )

धाकटा : मौज आहे ! आत्ता तुझी सिगारेट पेटवली ना, ती त्या मुडद्याच्या माचिसनं ! ( मोठा भाऊ नव्हेंस. ) त्याच्या सामानाची मी तपासणी केली ना —

मोठा : ती ती पत्रं—त्यातलं काही तू वाचलंस ?

धाकटा : ( हसतो.) त्या मुडद्याच्या पाकिटात दोनशे रुपये होते. नुसत्या कोऱ्या नोटा. सुटे पाचसहा रुपये. थोडी चिल्लर. पाकिटात एक फोटो होता छोटासा. त्याच्या पोराचा असेल नाही तो ?

मोठा : काय करायचंय् आपल्याला ? कुणी का असेना तो पोरगा !

धाकटा : तो पोरगा त्याचाच असेल. नाहीतर कशाला कोण पाकिटात फोटो ठेवतोय्! हां! पण एखादेवेळी तो पोरगा–( विचार करतो. )

मोठा : कोण असेल?

धाकटा : त्या मुडद्याच्या रखेलीबिखेलीचा असेल. नेम नाही. ( मोठा भाऊ दचकतो. धाकटा हसतो. ) तुला सांगू? आपल्या वडिलांनीसुद्धा एक बाई ठेवली होती म्हणतात. तुला माहीत आहे?

मोठा : ना–नाही!—पण पुढलं सांग काय ते—

धाकटा : कशाबद्दल?

मोठा : त्या पत्रांची विल्हेवाट तुझ्या मित्रानं लावली ते—

धाकटा : आणि नाही सांगितलं तर?—मी नाही सांगणार.

मोठा : नाही सांगणार तर इथं आलास कशाला?

धाकटा : तुला खुनाची गोष्ट सांगायला. तुला ही गोष्ट कळली पाहिजे. आपल्या घराण्याचं नाव लावणारा एक खुनी आहे हे तुला कळावं म्हणून! तुला घराण्याचा मोठा अभिमान आहे. घराण्याच्या नावावर, तुझ्या बुद्धीवर, तू रावसाहेब देशमुखांची मुलगी मिळवलीस. अमेरिकेला जायचा बेत आखलास. महिन्याभरात तू अमेरिकेला जाशीलसुद्धा. तुझ्या ह्या आनंदाला जरासं काळं फासायला मी आलोय्. कळलं? असं काळं लागलं, की वैभवाला दुसरी दृष्ट पडत नाही. लक्षात ठेव, हे काळं लावण्याचं मोठं कृत्य मी केलं आहे. तुझ्या धाकट्या भावानं केलं आहे. हे तुला अमेरिकेला जाण्यापूर्वी समजावं, म्हणून मी आलो.

मोठा : हे समजलं नसतं तर काही बिघडलं नसतं. आपल्या इभ्रतीला, खानदानीला, शोभणारी गोष्ट आहे ही? माझ्या सुखात बिब्बा घालायला आला आहेस तू! माझा तुला हेवा वाटतो. आपला भाऊ कुणी मोठा आहे, हे ऐकताना तुला शरम वाटते ना? आपलं आयुष्य गटारात भिरकावलंस तू! शिकला असतास, शहाणा झाला असतास, चांगल्यांची संगत धरली असतीस, तर—

धाकटा : तर तुला ते चाललं नसतं. तेव्हा तू बिब्बा घातला असतास. मी असंच राहावं ही तुझी इच्छा होती. माझ्यावर खोटं प्रेम दाखवून दुसरीकडे तू माझ्या वडलांचे कान फुंकत होतास. सगळी इस्टेट—

मोठा : मला वाटतं, तू जावंस आता इथून! फार बोललास. तुझी लायकी नसताना मी तुझ्याशी चार प्रेमाचे शब्द बोललो. धाकटा भाऊ म्हणून तुला वाचवण्याचा विचार करत होतो, पण तुला त्याची जाणीव नाही. मी तुला आता काहीच मदत करणार नाही. तुला मी पोलिसांच्या हवाली केला नाही हेच नशीब मान. मी नुसता फोन करायचा अवकाश आहे, कळलं? तू जा आता माझ्या समोरून! पुन्हा तोंड दाखवू नकोस! उपकाराला तू पात्र नाहीस! पोलीस आले माझ्याकडे, तर मी चक्क सांगेन – माझ्या धाकट्या भावानं हा खून केला आहे. तो इथं माझ्याजवळ सकाळीच कबुली देऊन गेला. हे सगळं सांगतो मी. जबलपूरचा रामाधार परदेशी तुला पत्रं पाठवायचा. त्यानं धमकी देऊन तुझ्याकडून दहा हजार रुपयांची मागणी केली. जुहू बीचवर रात्री साडेअकराला तुमची भेट झाली. तू त्याच्या पोटात सुरा खुपसलास—

धाकटा : ( हसतो. ) सगळं पाठ आहेच तुला! जरा चुकलंय् तेवढं ऐक—रात्री पावणेबारा वाजता भेट झाली आणि सुरा पाठीत खुपसला, असं सांगितलं होतं मी तुला!

मोठा : निर्लज्ज! निमकहराम! दुष्ट! सैतान! ( धाकटा भाऊ फक्त हसतो. ) तू हसू नकोस! इट गेटस् ऑन माय नर्व्हज्! पशू! जिथंतिथं विष ओकायचं, याखेरीज तुला दुसरं काही काही ठाऊक नाही!

धाकटा : ( हसतो. ) दुसरं काहीच ठाऊक नाही?—मला काय ठाऊक आहे हे तुला काय ठाऊक आहे?— सांगू? नीट ऐक. तू माझ्या वडलांचा मुलगा नाहीस हे मला ठाऊक आहे. वडलांची रखेली होती ना, तिचा तू मुलगा आहेस. दुसऱ्यापासून पूर्वी झालेला. दुसऱ्यापासून म्हणजे रामाधार परदेशीच्या वडलांपासून झालेला.—ऐकायचंय् आणखी? हा रामाधार तुझ्या परिचयाचा होता. तू उत्तरं पाठवली नाहीस तरी त्याची धमकीची पत्रं तुला यायची! आपली जन्मकथा कळून रावसाहेबांच्या मुलीशी जमलेलं लग्न मोडू नये, म्हणून तू रामाधारला पैसे देत होतास. थांब. पुढलं ऐक,—रामाधारचं तुला पत्र आलं होतं दहा हजार रुपये दे म्हणून... सांगू आणखी?—

मोठा : नको!—जरा पाणी देतोस? ( धाकटा पाणी देतो. पाणी पिऊन. ) तुला—तुला कसं कळलं हे?

धाकटा : रामाधारचं मला पत्र आलं होतं, जुहू बीचवर येण्यासाठी! त्याला माझ्यासारख्या गुंडाची मदत हवी होती.

मोठा : त्या पत्रात तू—तू म्हणालास ते सगळं होतं ?

धाकटा : सगळं नव्हतं. पण मला हे सगळं कळलं त्याच्या खिशातली पत्रं वाचल्यावर!

मोठा : ' पत्रं वाचली नाहीत ' असं बोललास ते खोटं होतं तर!

धाकटा : ( हसतो ) खरं आहे!—ते खोटं होतं हे खरं आहे... आणखी एक गोष्ट खोटी बोललो.

मोठा : कोणती ?...

धाकटा : रामाधारचा खून मी केलेला नाही! दुसऱ्याच कुणी केलाय्. मला जुहू बीचवर जायला उशीर झाला होता. तिथं गेलो तर तो मरून पडलेला! कुणीतरी त्याचा आधीच खून केला होता.

मोठा : म्हणजे--तू नाही ना खून केलास ? दुसऱ्या कुणीतरी केलाय् ना ?

धाकटा : हो. मी मग त्या मुडद्याच्या खिशात हात घातला.

मोठा : पण कशाला ?

धाकटा : ( हसतो. ) जित्याची सवय!—मेलेल्याच्यासुद्धा खिशात हात गेला. खिशातून मी सगळ्या गोष्टी बाहेर काढल्या. रुमालात बांधून बरोबर घेतल्या. मुडदा कंप्लीट रिकामा केला.

मोठा : पुढं ?

धाकटा : परत येताना सिगारेटचं पाकीट घेतलं. राणे कॉन्स्टेबलशी मुद्दाम गप्पा मारल्या.

मोठा : पण का ?

धाकटा : मी मुडद्याच्या जवळपास होतो हे राणेच्या नंतर लक्षात यावं म्हणून!

मोठा : इथंच चुकलास! तू पळून यायचंस.

धाकटा : ( हसतो. ) अंहं! मला एक संशय होता म्हणून मी मुद्दामच हे कारस्थान केलं! खोलीवर आल्यावर सगळी पत्रं वाचली, कागद चाळले आणि संशय पक्का झाला.

मोठा : कसला संशय ?

धाकटा : खून कुणी केला असावा याबद्दलचा!

मोठा : कुणी केला असेल खून ?

धाकटा : ( मोठ्यानं हसतो.) मग सांगेन. सकाळी वर्तमानपत्रात बातमी वाचली. पोलीस तपासात आहेत कळलं. मग मी पत्रं जाळली. पाकीट, जबलपूरचं तिकीट, त्याचा रुमाल एवढ्याच गोष्टी खोलीवर ठेवल्या. एव्हाना राणे कॉन्स्टेबल माझ्या खोलीची झडती घेत असेल. ( हसतो. ) मघाशी तू बोल-लास तसं बोलून बघतो हं ! व्हॉट अ रिलीफ आय हॅड ! बरोबर ना ? सिगारेट आहे ? दे एक. ह्या मुडद्याच्या माचिसनं पेटवतो आणि झक्कपैकी झुरका मारतो. ( मोठा भाऊ सिगारेट देतो. ती पेटवतो. )

मोठा : पण हे सगळं कशासाठी ? का म्हणून ?

धाकटा : तुला वाचवायला ! खून तू केला आहेस ! तुझ्याशिवाय दुसरं कोण असणार ! रामाधारनं तुला आणि मला दोघांनाच जुहू बीचवर बोलावलं होतं. मी तिथं उशिरा गेलो. खून झालेला पाहून पहिला विचार आला, तुला वाच-वायचा. पुरावा नष्ट करण्यासाठी रामाधारचे खिसे पाहिले. रिकामे केले. येताना स्वतःवर आळ घेण्यासाठी राणे कॉन्स्टेबलचा नवा पुरावा तयार केला. खोलीवर पत्रं वाचली...

मोठा : हे सगळं—

धाकटा : कशाला ? सांगू ? माझ्या घराण्याचं नाव तू लावतो आहेस म्हणून ! तू मोठा झालास. अमेरिकेला जाऊन आणखी मोठा होणार. मी असाच राहिलो काय किंवा आणखी खुनी ठरलो काय, घराण्याला कलंकच ! अरे, लहानपणी चुकून म्हणून का होईना, तू जीव लावला होतास माझ्यावर. मी छळतच राहिलो सगळ्यांना. उपकारांची थोडीशी फेड करायची म्हणून ही संधी घेतली. हां ! वाईट एकाच गोष्टीचं वाटतं, तू एकदाही म्हणाला नाहीस—तू खुनाचा आळ घेऊन जिवानिशी का जातोस म्हणून ! माझा कसाही असला तरी जीव प्यारा नाही का मला ? फळंफुलं देणाऱ्या झाडासाठी काटेरी रोपटी उपटावी लागतात. त्या काटेरी रोपट्यांनादेखील जीव असतो ! पण असा जीव देताना तू नुसती जरी तयारी दाखवली असतीस ना, फाशी जाऊन मला सोडवायची, तर हा जाता जीव अगदी हसतहसत गेला असता ! ...ठीक आहे ! हा तुझ्या—माझ्या रक्तातला फरक आहे !

मोठा : पण कशाला ? मी खून केला आहे. व्हायची ती शिक्षा होऊ दे मला.

मी तयार आहे सगळ्या गोष्टींना. तुझा जीव—

धाकटा : ( हसतो. ) हे शब्द हृदयातून उमटायला आपल्या घराण्याचे संस्कार हृदयापर्यंत पोचावे लागतात. तुला अजून अवकाश आहे... ( बाहेर पावलांचे आवाज. पोलिसांच्या शिट्या...दारावरची घंटी वाजते. ) पोलीस माझ्याच मागावर असणार. आता नक्की झालं. लक्षात ठेव, तुला काही काही माहिती नाही. खुनी मी आहे. घराण्याला कलंक मी आहे. ( घंटी पुन्हा वाजते. दारावर ठक् ठक् आवाज. ) जाऊ पुढं दार उघडायला ? आता धीर सोडू नकोस. जातो हं पुढं !... ( टेबलावर बघतो. मघाचची माचिस तिथंच पडलीय. माचिस उचलतो. ) इथं नको ही !

( धाकटा भाऊ दाराकडे जातानाच पडदा. )

# २. मार्ग

[ पडदा उघडला जातो. केदार–वसुंधरेची जागा. अंधुक प्रकाशात केदार खुर्चीवर बसलेला दिसतो. विमनस्कपणे. तो बराच वेळ तेथे बसलेला आहे.
वसुंधरा येते. दिवा लावते. केदारला पाहून दचकते.
दोघे वयाने तिशीपस्तिशीतली. तरतरीत. ]

वसुंधरा : ऑं ! तुम्ही ? केव्हा आलात ?
केदार : अंऽ...
वसुंधरा : केव्हा आलात ?
केदार : झाला अर्धा तास.
वसुंधरा : मग मला हाक का नाही मारलीत ?
केदार : ( काही न समजून ) हो.
वसुंधरा : मी आतच होते मुलूजवळ. केव्हाची वाट पाहात होते. चहा तयार आहे. आणू ?

केदार : आण...सुलू काय म्हणत्येय् ?

वसुंधरा : झोपलीय् आत्ताच. (आत जाऊन चहा आणते.) कुठून — कामावरूनच आलात ना ? (चहा देते.)

केदार : मग कुठून येणार ? (चहा एका घोटात पिऊन कप परत देतो.) शीः ! अगदीच गार होता चहा !

वसुंधरा : पुन्हा ठेवू ?

केदार : नको.

वसुंधरा : काय झालं ?

केदार : कशाबद्दल ?

वसुंधरा : केसबद्दल.

केदार : के–केस ? कसली केस ?

वसुंधरा : कशाला फसवता मला ? मला ठाऊक आहे. गेला महिनाभर तुम्ही—

केदार : तुला सगळं ठाऊक आहे ?

वसुंधरा : हो. सगळं.

केदार : सगळं म्हणजे ?

वसुंधरा : सगळं ! एकूण एक !...आज निकाल लागणार होता, हेसुद्धा !...काय झालं आज ?

केदार : काय होणार ? व्हायचं तेच झालं ! साहेबांनी मला बोलावलं. म्हणाले, 'मिस्टर केदार, आमचा अगदी नाइलाज आहे.'...वसू,—वसू, मला कमी केलंय् कामावरून !

वसुंधरा : खरंच ?

केदार : मग काय खोटं सांगतोय् ?...आणि खोटं सांगत असेन तर तुला खरं सांगणारी माणसं आहेतच ना ?...तुला कुणी सांगितलं केसबद्दल ?

वसुंधरा : सांगितलं कुणीतरी !

केदार : पण कुणीतरी म्हणजे नेमकं कुणी ? वसू, माझी शपथ आहे तुला. नाव सांग त्याचं.

वसुंधरा : अमृ — अमृतरावांनी !

केदार : अमृत ? म्हणजे अजून तुझे–त्याचे घाणेरडे संबंध—

वसुंधरा : केदार ! भलतंसलतं मी ऐकून घेणार नाही.

केदार : तुझे–त्याचे संबंध होते की नाही घाणेरडे ?

वसुंधरा : लग्नापूर्वीचं सारं विसरायचं ठरलं होतं आपलं !

केदार : आणि तरीही तू त्याला – त्या हलकट माणसाला भेटतेस अजून ?

वसुंधरा : भेटत नाही. तेच आले होते इथं.

केदार : इथं ? माझ्या गैरहजेरीत ?... किती वेळा येऊन गेला तो इथं ?

वसुंधरा : दोनदा – हो. फक्त दोनदाच.

केदार : आणि एका शब्दानंदेखील बोलली नाहीस तू मला कधी ! ( तिला एकदम धरतो. ) का – का नाही बोललीस ? पुन्हा घाणेरडे संबंध जोडलेस, म्हणून ना ?

वसुंधरा : नाही ! तुमचं मन केसमुळं थाऱ्यावर नव्हतं, म्हणून बोलले नाही मी. तुम्ही तरी सांगितलं होतंत् मला केसबद्दल ?

केदार : पण ... अमृत कशाला आला होता इथं ?

वसुंधर : नाटकात काम करणार का म्हणून विचारायला !

केदार : अस्सं ! पुन्हा तीच पहिल्यापासून सुरुवात आणि पोटात पुन्हा पापाचा जीव !

वसुंधरा : केदार ! घाणेरडं बोलायला शरम नाही वाटत ?

केदार : त्यानं...त्यानं काहीच अतिप्रसंग नाही केला ? मी इथं नव्हतो. भरपूर एकान्त ... तुझ्या आईपासून चालत आलेलं तुझं पूर्वचरित्र...आता तर तू विवाहित—

वसुंधरा : नाही, नाही, नाही ! ते आले तेव्हा पहिल्यानंच मी त्यांना सांगून टाकलं – पूर्वीचा मार्ग मी सोडलाय् म्हणून !

केदार : मग तो काय म्हणाला त्यावर ?

वसुंधरा : म्ह—म्हणाले —

केदार : सांग ना !

वसुंधरा : म्हणाले, ‘ तू नाटकात पुन्हा काम कर. पन्नास रुपये नाईट आणि महिन्याला दहाबारा प्रयोग. ’

केदार : कसले ?

वसुंधरा : कसले म्हणजे ? नाटकाचे. कळलं ? मी म्हटलं, ‘ मला पैशाची गरज नाही. ’ तशी त्यांनी मला सारं सांगितलं.

केदार : कशाबद्दल ?

वसुंधरा : तुमच्या केसबद्दल! ते म्हणाले, तुमची नोकरी जाणार आहे.

केदार : आणि तुला आनंद झाला!

वसुंधरा : वाटतं का तुम्हांला असं म्हणायला काही? सगळा जीव ओवाळून टाकलाय् मी तुमच्यावर आणि आपल्या संसारावर! तुमच्या नोकरीबद्दल ऐकलं आणि माझ्या पायांखालची जमीन सरकली हो! ...कसं सांगू तुम्हांला!

केदार : पण... पण त्या अमृतला तरी आनंद झाला असणार! पुन्हा धंदे करायला मिळतील म्हणून. आणि तू —

वसुंधरा : एकदा सांगितलं ना मी? मला जुन्या गोष्टी गाडून टाकायच्या आहेत! तुम्हांला मी वचन दिलंय् एकनिष्ठ राहण्याचं आणि तुम्हीदेखील वचन दिलंय् मला – जुना मार्ग सोडण्याचं! विसरलात?

केदार : कालपर्यंत विसरलो होतो.

वसुंधरा : नोकरी होती म्हणून ?

केदार : हो. आज निकाल लागला आणि सगळ्या गोष्टी जिवंत झाल्या – माझ्या पराभवाची संजीवनी पिऊन!... ही पाच वर्षं कशी भुर्रकन् गेली ग!

वसुंधरा : तुमची वाट पाहात मी दिवसभर घरात राह्यची —

केदार : तुझ्या ओढीनं मी भराभर काम संपवून घरी धावत सुटत होतो...

वसुंधरा : नाटकं नाहीत...

केदार : गुंडगिरी नाही...

वसुंधरा : जागरणं नाहीत...

केदार : वसू, नाटकाची जागरणं म्हण. नाहीतर आपण रात्र-रात्र गप्पा मारल्या आहेत. वसू, आपल्या दोघांशिवाय तेव्हा कुणीच नव्हतं नाही जगात?

वसुंधरा : सुरू झाली तेव्हापासून मात्र सुलूखेरीज कुणीच नव्हतं जगात. कसली काळजी नाही. दुःख नाही...

केदार : त्या साऱ्यांची भरपाई करण्याची वेळ आलीय आज. वसू, मला नोकरी नाही ग! माझं डोकं किनई... छे:! जुना मार्ग मी सोडला; नव्या मार्गानं जाऊ लागलो. पण दुनियेला ते नकोय्. ज्या मार्गानं तुम्ही एकदा चाललात,

त्याच मार्गावर खिळे मारून ठेवतात तुम्हांला. तोच तुमचा मार्ग. त्या मार्गाला तुमचंच नाव. दुसऱ्या मार्गानं जायचं तुम्ही ठरवलंत, तर दुनिया तिथं काटे पसरून ठेवते.... वसू, तुला वाटतं, मी दोषी आहे ?

वसुंधरा : नाही हो ! मी ओरडून सांगेन दुनियेला — तुम्ही निर्दोषी आहात ! पापाची एक दिडकीसुद्धा तुम्ही जवळ करणार नाही !

केदार : वसू, वसू, तुला खरंच खात्री आहे इतकी ?

वसुंधरा : मग ? मला वचन दिलंय् तुम्ही. तेवढं वचनच मला पुरे आहे खात्री पटायला.

केदार : अग, हेदेखील मी शेवटी साहेबांना सांगितलं. पण त्यांचं एकच— 'तुमचं पूर्वीचं कॅरेक्टर चांगलं नाही. तुम्ही फर्नांडिसच्या गॅंगमधे होता...' मी म्हटलं, 'लग्नापासून पाच वर्षं झाली. मी फर्नांडिसचं तोंड पाहिलेलं नाही की गॅंगमधल्या कुणाला कधी भेटलो नाही.' मी देवाची शपथ घेतली, धाकट्या सुलूची घेतली. वसू,— वसू, आपला संसार सावरण्यासाठी मी साहेबांच्या पायाला हात लावून त्यांचीदेखील... ( गहिवरतो. )

वसुंधरा : ( सद्‌गदित ) मग ? तरीसुद्धा काही—

केदार : नाही ग. कशाचा काही उपयोग झाला नाही. ते म्हणाले, 'तुमचं कॅरेक्टर माहीत असूनदेखील आम्ही दुसऱ्याच्या विश्वासावर तुम्हांला ठेवलं, हेच चुकलं आमचं...!' वसू, तो फर्नांडिस भोवलाय् ग मला !

वसुंधरा : अहो, गेले दोन दिवस तो आपल्या रस्त्यावर दिसतोय् मला.

केदार : कु—कोण ? फर्नांडिस ?

वसुंधरा : हो.

केदार : त्याला कुठं मिळाला आपला पत्ता ?

वसुंधरा : कुणास ठाऊक !

केदार : माझ्या ऑफिसातसुद्धा तो एकदोनदा येऊन गेल्याचं कळलं मला. हल्लीच !

वसुंधरा : कशाला आला होता ?

केदार : काही कळलं नाही. त्याला माझ्या केसचा सुगावा लागला असणार. वसू, ही चांगली नोकरी गेली. आता काय ग करायचं ?

वसुंधरा : दुसरीकडे कुठं—

केदार : मिळणार नाही ! इथं ओळख होती मोटी. आता कुठं कोण ओळख देणार ? बरं. नवीन ठिकाणी पूर्वीच्या नोकरीचं सर्टिफिकेट मागितलं म्हणजे ? हात दाखवून अवलक्षण !

वसुंधरा : मग ... मी... मी करू का नाटकात काम ? महिन्याला पाचशे-सहाशे रुपये मिळतील !

केदार : आणि त्याच्या बदल्यात तुझं शील द्यायचं ! संसाराची राख ! बेकार नवऱ्याची बायको नटी झाली की—

वसुंधरा : असं काहीतरी बोलू नका ना ! मी तुमच्यावर विश्वास ठेवलाय्. तुम्ही माझ्यावर ठेवा. आपलं हे नवीन आयुष्य आपण आदर्श करून दाखवू आपल्या मुलासाठी—

केदार : पण वसू, इतकं सोपं आहे हे ? ( बाहेरून शीळ ऐकू येते. केदार अस्वस्थ होतो. ) खिशात पैसा आला की त्याचा धूर डोळ्यांत जातो. बरंवाईट काही दिसेनासं ... ( पुन्हा शीळ ऐकू येते. ) व – वसू !—

वसुंधरा : कुणी शीळ घालतंय् का ?

केदार : न्–नाही. कुठं काय ?

वसुंधरा : मग तुम्ही शीळ ऐकल्यावर असे भांबावलात का ?

केदार : क्–कोण ? मी ? छे ! ( पुन्हा शीळ. ) छेः ! भास होतोय् तुला.

वसुंधरा : भास नाही, अगदी चांगली ... ( शीळ जवळ येते. ) ही पाहा !

केदार : कुठं ?

वसुंधरा : इथं जवळपास— रस्त्यावरून येत्येय् मला वाटतं. ( पुन्हा शीळ )

केदार : काय म्हणत होतो मी ?

वसुंधरा : आता काय करायचं आपण ? हा मांडलेला संसार उभा ठेवायचाय् हो आपल्याला !

केदार : काढू काहीतरी मार्ग. ( उगाचंच शिळेची वाट पाहतो. )

वसुंधरा : कुठला ?

केदार : कुठलातरी तिसराच. वाट्टेल ते झालं तरी तुझी–माझी ताटातूट होऊ द्यायची नाही. वसू, मधाशी मी अमृतबद्दल बोललो ... ( शिळेची वाट पाहतो. )

वसुंधरा : ऐकलीत ? पुन्हा शीळ !

केदार : अंहं ! उगाच भास आपला ! अमृतबद्दलचं सारं विसरून जा हं माझं बोलणं ! शपथ आहे माझी. मला तू फार आवडतेस वसू. ( हलकी शीळ येते. ) तुला सांगू ? अमृतचं नाव निघालं की माझ्या तळपायाची आग मस्त-कात जाते. तुझे किती हाल केले ग त्यानं ! त्या घाणेरड्या दवाखान्यातली— ( शीळ जवळ येते. )

वसुंधरा : केदार, प्लीज, नको— त्यातली एकदेखील आठवण नकोय्. तुम्ही मला तशाही परिस्थितीत जवळ केलंत... आता सगळ्या अंधारावर पडदा पडलाय्... सगळं काही... ( बाहेरून शीळ. पाठोपाठ दारावरची घंटी ऐकू येते. ) केदार, कोण आलं असेल ?

केदार : अमृत ?

वसुंधरा : की फर्नांडिस ?

केदार : मला कुणीच नकोय्. वसू, दार उघडतेस ?

[ वसुंधरा दाराकडे जाते. दार उघडल्याचा आवाज. ' हॅल्लो मदाम ! ... नंतर हसणे... वसुंधरा आणि तिच्यामागून फर्नांडिस येतो. तो मघांचीच शीळ घालीत आहे. फेल्ट हॅट, बो, काळी पँट, गॉगल. ]

फर्नांडिस : हॅल्लो केदार ! ( सगळीकडे नजर फिरवतो. मध्येच शीळ घालतो. )

केदार : ( भकासपणे ) हॅल्लो फर्नांडिस !

फर्नांडिस : ( निरखून इकडेतिकडे बघत ) तुमच्याकडे ॲश-ट्रेदेखील नाय्! मला सिग्रेट ओढायची—

केदार : न्-नाही. पण तू ओढ ना सिग्रेट.

फर्नांडिस : ( सिगरेटचं पाकीट काढून केदारपुढे धरतो. ) तू घेणार ?

केदार : नको. मी सिगरेट सोडलीय.

फर्नांडिस : ( हसतो. ) किती दिवस झाले ?

केदार : पाच .. पाच वर्षं ..

फर्नांडिस : ( सिगरेट पेटवतो. ) मला पाहून तू सरप्राइज् झाला असशील !

केदार : ऑं ?

फर्नांडिस : ( वसुंधरेकडे बघतो. ) केदार, तुझी वाइफ काय ?

केदार : हो. ...वसू, हा फर्नांडिस.

वसुंधरा : नमस्कार.

फर्नांडिस : गुड् इव्हिनिंग ! ( हसतो. ) केदार, तुला काँग्रॅच्युलेशन्स् द्यायला आलोय् !

वसुंधरा : का ?

फर्नांडिस : त्याचा जॉब गेला ना, म्हणून ! ( हसतो. )

केदार : पण तुला .. तू... ( उगाच हसण्याचा प्रयत्न करतो. ) मला वाटलं, दुसरं कुणीतरी आलंय् !... वसू, तू आत जा. सुलू उठली असेल...जा ना ...अंऽ —हो ! फर्नांडिस, चहाकॉफी काही घेणार ?

फर्नांडिस : ( मोठ्यानं हसतो. ) ' त्या 'च्यावर चहा–कॉफी ?... ( हसतो. ) फार तर सोडा घेईन. सोडा नसेल तुझ्याकडे.

केदार : न्–नाही.

फर्नांडिस : आँ ? साला कमाल झाली ! राहू दे. ( वसुंधरेकडे बघून ) भाभी, तुम्ही आत जा... हां ! म्हणजे माझी जबान—

केदार : वसू, आत जा ना.

[ वसुंधरा आत जाते. ]

फर्नांडिस : थँक्स !...केदार, हे फर्स्ट क्लास झालं. तुझ्या वाइफच्या सामने टॉक् करायचा... प्रायव्हेट आहे... एकदम कॉन्फिडेन्शल...

केदार : तुला . तुला पत्ता कसा मिळाला माझा ?

फर्नांडिस : ( हसतो. केदारच्या खांद्यावर हात ठेवून ) ॲड्रेस ? साला तुझा ॲड्रेस मिळत नाय् म्हणजे काय ? आँ... मोठमोठ्या डेकॉयटीमधे काय कमती ॲड्रेस मिळवले होते आपण ?... अरे, चांगल्या जंटल्मन वस्तीत हातभट्टीचा वास घेतो मी ! तुझ्या हापिसात येऊन गेलो मी.

केदार : कळलं मला. पण... कशाला आला होतास ?

फर्नांडिस : तुझ्या केसचं लफडं कळलं. म्हटलं, फ्रेंडशिपमधला दोस्त आहे. त्याची भानगड ...

केदार : पण... पण मी निर्दोष आहे.

फर्नांडिस : ( हसतो सिगरेट टाकतो. ) वाः ! आपला फ्रेंड म्हणजे—

केदार : मी काहीदेखील केलेलं नाही. कुणी दुसऱ्यानं लबाडी करून माझ्यावर बालंट—

फर्नांडिस : ती तर साली आहे आदत पब्लिकची. लफडं करायचं आणि सालं

गँगमधल्या मेंबरचं नाव—

केदार : गँग ! माझा काय संबंध गँगशी ?

फर्नांडिस : ( हसतो. ) ठीक आहे. पण जुनं रेकॉर्ड एकदम खराब आहे तुझं. ( हसून ) ह्या फर्नांडिसच्या गँगचा तू साला राइट हँड होतास ! ऑं ?

केदार : मी ते सगळं सोडून दिल्याला आता पाच वर्षं झाली.

फर्नांडिस : पाच वर्षं म्हणजे नथिंग ! मी न्यू इयरला नाय केटीला प्रॉमिस् देत ड्रिंक सोडायचं ? पण एक मंथ गेला की खतम् ! ( पुन्हा ड्रिंक घेतो. ) एक-दम टाइट !... पाच वर्षांचं काय सांगतोस ?... आपण काय इज्जतवाली माणसं आहोत ? तू साला अगेन आपल्या लायनीला येणार.

केदार : शक्य नाही आता. बायकोला मी लग्नाच्या वेळी—

फर्नांडिस : ( हसतो. सिगरेट शिलगावतो. ) ह्या—ह्याच वाइफला ना ? आत्ता होती इथं ती. —अरे साला ती ड्रामात रोल करायची. आय् नो हर. प्रॉस्टि-ट्यूटची डॉटर प्रॉस्टिट्यूट ! राइट ?

केदार : चूप बस ! माझ्या बायकोबद्दल—

फर्नांडिस : ( खिशात हात घालतो. ) केदार, रिव्हॉल्वर आहे पॉकेटमधी. कुणाच्या बापाची टाप नाय् मला चूप बोलायची ! पण आपण आपसआपस-मधी माफ केलं पायजे. तुझी वाइफ्—

केदार : माझ्या बायकोबद्दल काही बोलू नकोस भलतंसलतं !

फर्नांडिस : (मोठ्यानं हसतो. ) साला भलतंसलतं बोललो तर रिव्हॉल्वर घेऊन तू शूट कर मला. मी एकदम खरं बोलतो. ट्रुथ ! तुझी वाइफ प्रॉस्टिट्यूट बोललो ती फॅक्ट आहे. तुझ्या मॅरेजच्या पयले तीन टायमाला तिचा ॲबॉर्शन ...( हसतो. ) झूट नाही. डॉक्टर डिसूझा या कामात हुशार ! तिथून मेडिसिन् घेऊन जायचा तो. त्याचं नाव बघ—

केदार : फर्नांडिस !

फर्नांडिस : (मोठ्यानं हसतो.) नो नो ! माझं काय पण कनेक्शन नाय्. त्याचं नाव बघ... हॉं ! अमृत ?...अमृत ! डॉक्टर डिसूझाचा कंपौंडर जॉन. आपल्या फ्रेंडशिपमधला. एकाच भट्टीतले आम्ही. असा टाइट ड्रिंक करायचा. विदाउट सोडा. एकदम नीट ड्रिंक घ्यायचा. पेगामागून पेग... आणि साला टॉप गिअरला गेला की वार्ता बोलायचा— तुझ्या वाइफची ! ( हसतो. )

केदार : फर्नांडिस ! शट्—

फर्नांडिस : खिशात हात घालून शीळ घालतो. ( केदार गप्प बसतो. ) फ्रेंड, रात्री विचारून घे वाइफला—डॉक्टर डिसूझाचं मेडिसिन कसं होतं म्हणून !

केदार : मी काही विचारणार नाही. मला सगळं माहीत आहे.

फर्नांडिस : सचमुच ? साला तुझी जिगर पण जिगर आहे ! एका प्रॉस्टिट्यूटबरो-बर मॅरेज—

केदार : बस् झालं ! आम्ही दोघं आता बदललो आहोत. तुझी गँग मी सोडली. तिनं नाटक कंपनी सोडली.

फर्नांडिस : झूट ! एकदम बंडल ! तो व्हिलन अमृत—त्याला मी इथं पाह्यलाय् तुझ्या ॲब्सेंटीमधी... हॉं ! नॅचरल आहे. तो साला कारवाला, रिच् आहे. रुबाबशीर आहे. तुझ्यासारखा क्लार्क नाय. मामला खुल्लम् खुल्ला !

केदार : फर्नांडिस, माझं डोकं खाऊ नकोस. कशाला आला आहेस, सांग.

फर्नांडिस : कशाला ? थोडं काम आहे. एकदम साला कॉन्फिडेन्शल... हॉं ! तो अमृत आहे ना, त्यानं मला खबर दिली, तुझा जॉब जातोय् म्हणून. मला वाटतं, त्यानंच चावी मारली असेल तुझ्या हपिसात, तू माझ्या गँगमधी होतास म्हणून ! साला मगज पण मगज आहे व्हिलनचा !

केदार : तुझी आणि अमृतची कुठली ओळख ?

फर्नांडिस : ( हसतो. ) कुठली ? अगेन तेच ? डॉक्टर डिसूझाकडे जॉननं त्याची माझी पहेचान करून दिली. खूप खर्च केला त्यानं डॉक्टरकडे. तीन टायमाला गुपचुप—

केदार : फर्नांडिस, तू निघून जा. पुन्हा इथं येऊ नकोस.

फर्नांडिस : ओके. ( जायला निघतो. पुन्हा थांबतो. ) एक सिग्रेट ओढून जातो. हरकत नाही ना ?

केदार : .. ...

फर्नांडिस : ( सिगरेट पेटवतो. ) केदार !—

केदार : तू इथं आलेला मला... मला आता पहिली कंपनी नकोय्. माझ्या बाय-कोलादेखील—

फर्नांडिस : वाइफबद्दल कशाला बोलतोस ? तिला तर पयली कंपनी... ( हसतो. ) अमृतशेठ साला इथं पडलेला असतो.—हॉं ! पण तुझ्या ॲब्सेंटीमधी. इज्जत-

वाली तुम्ही माणसं आहात !

केदार : फर्नांडिस, माझ्याजवळ पिस्तुल असतं ना, तर—

फर्नांडिस : ( खिशातून पिस्तुल काढून केदारच्या समोर आपटतो. ) घे साल्या ! तुला एकदम प्रेझेंट !—

केदार : ( पिस्तुल घ्यायला हात पुढे करतो. ) मला प्रेझेंट ? कशाबद्दल ?

फर्नांडिस : अरे, हात तर लाव. नुसता टच् करून बघ. एकदम ब्रँड न्यू आहे. परवा एडनहून एक मेहमान आला त्यानं दिलं.—आठशे रुपयाला. ट्रिगर बघ...सायलेंटमधी काम होतं...( केदार पिस्तुलाकडे बघतो. त्याचे डोळे चमकतात. ) केदार, स्टार्टिंगपासून तुझा नेम ए—वन् होता. याद आहे ?

केदार : ऑं ?

फर्नांडिस : चेंबूरची गोष्ट...याद आहे ? तू एकदम टॅक्सीमधून शूट केलंस—

केदार : लक्षात नाही काही.

फर्नांडिस : छोड दो राजा ! पण तुझा नेम अजून सॉलिड असेल, ( पिस्तुल बळे-बळेच केदारच्या हातात कोंबतो. ) ट्रिगर खेचून बघ. ( केदार अभावितपणे फर्नांडिसच्या दिशेने पिस्तुल धरतो. फर्नांडिस हसतो. ) साला बॅरल एम्टी आहे. आत अजून बुलेट भरलेली नाही. तुझी फिरकी घेतली मी. केदार, ह्या रिव्हॉल्वरचं ओपनिंग तुझ्याकडून !

केदार : म्—माझ्याकडून ? ( पिस्तुल गोंजारीत राहतो. ) पण...पण...मी... म्हणजे...जुनी कंपनी...

फर्नांडिस : कसं आहे रिव्हॉल्वर ? वाटतं की नाय चालवावं ?

केदार : ( झटक्यात पिस्तुल परत करीत ) नाही वाटत !

फर्नांडिस : बंडल फेकू नकोस. तुझी खोपडी फिरताना दिसतेय...केदार, प्रेझेंट आवडलं का नाय् ? आता तू...हे बघ...ओपन टु क्लोज सांगतो. फिफ्टी थाउजंडची लाइन आहे. उचलणार ?

केदार : फिफ्—फिफ्टी ?

फर्नांडिस : फिफ्टी नाय्, फिफ्टी थाउजंड ! एका नाईटमधी. नेक्स्ट वीकला. अख्ख्या जिनगानीत इतके पैशे पाहिले होतेस ? साला सर्व्हिस करतो ! आता कोण तुला सर्व्हिस देणार ? सचमुच तुला त्यांनी जेलच दाखवायला हवा होता. प्रुफ् जरा सॉलिड् असतं ना, जेलमधी साफ पिसून निघाला

असतास !...

केदार : नाही नोकरी, तर नको ! मी... मी वाटेल ते करीन !

फर्नांडिस : ऑं ? एवढी जिगर ? मग साला मला तरी लाईन सांग तुझी. तू काय रे करणार ?

केदार : मी—मी चिवडा विकीन गाडीत. नाहीतर हमाली करीन...बूटपॉलिश करीन...भीक मागेन...

फर्नांडिस : पण कायकू ? व्हाय् ? तुझी वाइफ्...तिला अजून पैसे मिळतील. अमृत शेठसारखी गिऱ्हा—

केदार : शट् अप् यू फूल !

फर्नांडिस : ( हसतो. थंडपणे सिगरेट शिलगावतो. ) फूल ? फूल तू आहे. तुला खुल्लम् खुल्ला सांगतो. मला प्रॉमिस् दे. एका नाइटच्या कामाला पन्नास हजार रुपये देतो. तेवढी नाइट झाली की तू पुन्हा सुधार. चिवडा वीक, बुटपॉलिश कर.. शंभरच्या पाचशे नोटा देतो...बोल ! ( केदार अस्वस्थ ) खबर सॉलिड मिळाली आहे. आपल्या करीमनं आणलीय् म्हणजे बब. एकदम गँगनं फाइट द्यायची. गाडी तयार आहे. डॉक्टर डिसूझाची गाडी.. नंबर प्लेट बदलून तय्यार. तुझी हेल्प मिळाली तर सेंट परसेंट काम ! तुला पन्नास हजार; उरलेले गँगला. बोल, कबूल आहे ? ( खिशातून नोटा काढतो. ) हे हजार रुपये ॲडव्हान्स. ( नोटा टेबलावर टाकतो. )

केदार : अं...नाही...नको. जमणार नाही मला. मी सगळं सोडलंय्.

फर्नांडिस : एक नाईटसुद्धा जमणार नाही ? खाली एक नाईट. बस्स् ! एक नाईट —पन्नास हजार. सौदा फर्स्ट क्लास आहे. नो रिस्क. नो ट्रबल्. तुला मिळाली सर्व्हिस तरी फाइन. नाय्तर लफडं नाय्.

केदार : मला जमणार...जमणार नाही. सॉरी !

फर्नांडिस : नो सॉरी ! तू 'हो' म्हण केदार ! ( केदारचे खांदे पकडतो. ) केदार, से येस्. रिव्हॉल्वरची कसम आहे तुला ! अरे, स्टार्टिंगला तू असा गद्धा नव्हतास. काय जिगर होती तुझी !

केदार : पण...आता मला सुधारायचं आहे.

फर्नांडिस : पब्लिकला कुठं तू सुधरायला हवास ? साला असं असतं तर आज किक् मिळाली नसती. ऐ बंडल, सर्व्हिसमधी लफडं करताना सुधरायची याद

नाय् आली ती ?

केदार : कुणी—मी ? मी लफडं केलं ?

फर्नांडिस : मग काय तुझ्या बापानं केलं ? साला गँगवाला तो गँगवाला ! आता साईबाबा व्हायची वार्ता करतो ! बेवकूफ !

केदार : चूप राहा फर्न्या !

फर्नांडिस : चूप ! मी तर शाउट करून सांगेन—केदार एक नंबरचा बंडल आहे ! रास्कल आहे ! लफडेबाज आहे ! चेंबूरला—

केदार : ओरडू नकोस ! मी निर्दोष आहे. माझा काही संबंध नाही त्या लफड्यात.

फर्नांडिस : माझ्या गँगचा तू राईट हँड. कोण विश्वास करील तुझा ?

केदार : कोण म्हणजे ? कुणीही करील. माझी बायको करील. तिला मी वचन दिलंय्.

फर्नांडिस : वाइफला ?... त्या अॅक्ट्रेसला ? प्रॉस्टिट्यूटला वचन द्यायला तू काय इज्जतदार आहेस ? ( हसतो. )

केदार : काय झालं ?

फर्नांडिस : ( पुन्हा हसतो. ) साला अमृतशेठनंसुद्धा त्या प्रॉस्टिट्यूटला वचन दिलं होतं मॅरेजचं—तीन टायमाला ! पण काय झालं ? तीन टायमाला अॅबॉर्शन !

केदार : तू चालता हो !

फर्नांडिस : ओके. हे रिव्हॉल्वर इथंच ठेवतो. तू विचार करून ठेव. पायजे तर ( सिगरेटचे पाकीट फेकतो. ) मागाहून सिग्रेट ओढून विचार कर. त्या प्रॉस्टिट्यूटचं ओपिनियन घे. अमृतशेठचं घे. मी जरा वेळ खाली थांबतो ...शिटी मार ..नायतर परवा संडेला येईन तेव्हा लास्टचं सांगून टाक. का फोन करशील आपल्या रजिस्टर हापिसात ? नंबर—

केदार : माहीत आहे रे ! डबल् फोर सिक्स—

फर्नांडिस : फाईन ! सगळी याद आहे तुला. मी शुअर आहे, तू लाइन घेणार. वन नाईट—पन्नास हजार !...फरगेट करू नको...बाय् बाय् !

केदार : ( अस्पष्ट स्वरात ) हे पैसे... ( फर्नांडिस फक्त शीळ घालतो. खुणेने ' राहू देत ' असे सांगतो. ) बाय् बाय्.

[ फर्नांडिस शीळ घालीत निघून जातो. केदार टेबलावरच्या वस्तूंकडे बघत उभा राहतो. आतून वसुंधरा येते. संतापलेली. केदारचे लक्ष नाही. मग तो काही न समजून सिगरेट उचलतो. काड्यापेटी शोधून काढून सिगरेट पेटवतो. भराभरा झुरके मारतो. ]

वसुंधरा : छान! चांगलं चाललंय्!

केदार : ऑं?

वसुंधरा : गेला का तो राक्षस?

केदार : कोण?

वसुंधरा : तो राक्षस! तुमच्याकडे आलेला तुमचा दो—

केदार : अडखळलीस का? म्हण ना! म्हण—दोस्त!

वसुंधरा : मग सोडीन की काय? सिगरेट न ओढण्याचं तुम्ही मला वचन दिलं होतं. त्या राक्षसानं—

केदार : वसू, त्याचं नाव फर्नांडिस आहे. राक्षस नाही, समजलं?

वसुंधरा : मला काहीच समजत नाहीसं झालंय्. जुना दोस्त इथं पत्ता काढून येतो काय—

केदार : कुणाची भीती आहे त्याला? तुझा जुना दोस्त नाही येत इथं? तो अमृत? फर्नांडिस तर तुझ्यादेखत आला. अमृत माझ्या गैरहजेरीत येऊन –

वसुंधरा : केदार!

केदार : ओरडू नकोस. मी भिणार नाही. अमृत—अमृतशेठच्या भेटीपासून तुला जोर आलेला दिसतोय्.

वसुंधरा : केदार! .. केदार! ...

[ रडण्याच्या बेतात येते. ]

केदार : रडू नकोस. नाटकं पुरी नाही का झाली अजून?

वसुंधरा : अहो पण तुम्ही मला वचन—

केदार : वचन! वचन! वचन! ह्या वचनांच्या चौकटीत अगदी दाबून टाकलं आहेस तू मला! चौकटीची एखादी बाजू निखळली तर बिघडत नाही काही.

वसुंधरा : एक बाजू निखळली की सगळी चौकट ढासळते! सिगरेट... मग दारू...

केदार : तुझा अमृतशेट नाही दारू पीत ?

वसुंधरा : मला काय करायचंय त्यांच्याशी ? माझं लग्न तुमच्याशी झालंय्. तुम्ही कसं वागावं याचीच मी काळजी—

केदार : पुरे झालं ! माझ्याशी लग्न केलंस — त्या अमृतशेठच्या सोयीसाठी ? बेईमान औरत !

वसुंधरा : त्या राक्षसानं शिकवल्या वाटतं या शिव्या ?

केदार : त्यानं खूपच शिकवलंय् मला ! तुझ्याबद्दल तो काय-काय बोलत होता, माहीत आहे ?

वसुंधरा : तुम्हांला त्यातलं काहीच माहीत नव्हतं ? ... आणि तुम्ही ऐकून घेतलंत म्हणून बोलला तो. कशाला ऐकून घेतलंत ? त्याला लाथ मारून का नाही घालवलंत ?

केदार : तो मला... माझी नोकरी गेलीय् म्हणून... त्याला माझी परिस्थिती..

वसुंधरा : एका दिवसात तुम्ही इतके निराश झालात ? आजच नोटिस मिळाली ना ? सबंध आयुष्य पडलंय् समोर. वाटेल ती कामं करून आपण पोट भरू ! वेळप्रसंगी हमाली करून—

केदार : म्हणजे हमाली मी करायची, तू तोंडाला रंग लावून नाटकात नाचायचंस ?

वसुंधरा : अंगात कला असताना उगाच हलकी कामं कशाला करायची ? तुम्हांला नोकरी होती तेव्हा मी घरातच राहिले ना ? ... मी तर म्हणते, मी नाटकात कामं करून पैसा मिळवीन. तुम्ही एखादा लहानसा धंदा करून... पुरुषानं कमवावं म्हणून...

केदार : मी कसं कमवावं ते मला नाही समजत ?

वसुंधरा : मला सुचलं ते सांगितलं. सध्या तरी ह्या परिस्थितीला तोंड द्यायला मला नाटकात काम केलंच पाहिजे.

केदार : आणि मी काही करून तितकेच पैसे मिळवले तर ?

वसुंधरा : काही करून म्हणजे ?

केदार : वाट्टेल ते करून !

वसुंधरा : फर्नांडिसनं सांगितलं ते ? ऐकू येत होतं मला अधूनमधून !

केदार : अजून ठरलं नाहीय्. पण काहीच ठरवता आलं नाही तर मी तेच करणार. वन् नाइट आणि फिफ्टी थावुजंड रुपीज! ...तुझ्या हजार नाईट-इतके पैसे! एक हजार रुपये त्यानं ॲडव्हान्सदेखील दिलेयत्. त्या पाहा नोटा. मोजून बघ. तुझा जुना दोस्त तुला भेटला; माझा जुना दोस्त मला भेटला. फक्त एकदाच तो मार्ग धरायचा— एकदाच! आणि उरलेलं आयुष्य चांगल्या मार्गासाठी—

वसुंधरा : पाय वळतील का दुसरीकडे?

केदार : वळवायचे, नाहीतर तोडून टाकायचे आणि भीक मागायची ... वसू, दुसरा मार्ग नाही आपल्याला.

वसुंधरा : पण त्यापेक्षा मी नाटकांत कामं केली तर काय बिघडलं? जिवाला धोका नाही, धास्ती नाही...

केदार : ते शक्य नाही! या जन्मी शक्य नाही. पुन्हा तू आणि अमृत जवळ येता कामा नये! ... तुझ्याशी लग्न करून मी तुझा देह विकत घेतला. आता पन्नास हजार रुपयांत तुझं शील पुन्हा विकत घेणार मी. एका रात्रीचाच फक्त सवाल आहे.

वसुंधरा : पण केदार, त्या वाईट मार्गाला पुन्हा जायचं—

केदार : हो हो! जायचंच! गेलंच पाहिजे! कारण दुसरे मार्ग बंद आहेत. संसार संभाळण्यासाठी वाईट मार्ग पत्करायचंच ठरलं तर तो पुरुषानंच पत्करला पाहिजे. बायकोनं नाही. साधा, स्वच्छ व्यवहार आहे हा ... वसू, तू मला हवी आहेस. ही पाच वर्षं जशी आहेस, तशीच साऱ्या जन्मभर. माझी पतिव्रता बायको ... सुलूची आदर्श, सच्छील आई . वसू, ... वसू, फक्त तुझ्या या गुणावरदेखील प्रपंच उभा राहील आपला! ... ठरलं! वसू, सारं लख्ख दिसायला लागलं. मी 'हो' म्हणणार फर्नांडिसला. नेक्स्ट वीकला... वन् नाईट — ॲन्ड फिफ्टी थावुजंड रुपीज! ... एक हजार रुपये ॲडव्हान्स! लौकर नोटा मोजून घे. फर्नांडिस खाली थांबलाय्. त्याला कंदील दिला पाहिजे.

[ वसुंधरा टेबलाकडे जाते. पिस्तुल बघते. केदार तोंडात बोटे घालून कर्कश शीळ घालतो. वसुंधरा चमकून पिस्तुल उचलते. केदारकडे रोखते. ]

वसुंधरा : केदार, ती शीळ थांबवा. त्याला नाही म्हणून सांगा. नाहीतर मी चाप ओढून—

केदार : ( खदखदून हसतो. ) वसू, ओढ तो चाप ! ... रिव्हॉल्वर रिकामं आहे —आपल्या नशिबासारखं !

[ वसुंधरा तटस्थ उभी. केदार हसत राहतो. बाहेर फर्नांडिसची शीळ आत घुसते. एवढ्यात पडदा पडतो. ]

# ३. काला पहाड

[ पडदा उघडला जातो तेव्हा सावकारांच्या वाड्यातले दालन दिसते. वेळ : रात्री साडेबारानंतरची. सामसूम. दालनात अंधुक प्रकाश आहे. खिडकी उघडून काला पहाड आत उडी मारतो. टॉर्चच्या प्रकाशात इकडेतिकडे बघतो. त्याच्या खांद्यावर हत्यारांची पिशवी आहे. डोळ्यांना काळी पट्टी. अंगावर पट्ट्यापट्ट्यांचा गंजिफ्राक व काळी पँट. टॉर्चचा उजेड सगळीकडे फिरून कोपऱ्यातल्या तिजोरीवर थांबतो. तिथेच घुटमळतो.

काला पहाड तिजोरीसमोर बसतो. चारी बाजूंना नजर फिरवतो. तिजोरीवरची जळमटे दूर करून हत्यारांची पिशवी उघडतो. कुलुपाला हात घालून तो तिजोरी उघडण्याच्या प्रयत्नात असतानाच—

मधल्या दाराने भिकोबा येतो. दिवा लावतो. भिकोबा सावकार. वय ३०–३२ वर्षे. अंगावर ऐदीपणा चढलेला. एकंदर आयुष्य आरामात

गेलेले. पुढेही जाणार आहे असा चेहऱ्यावर भाव. काला पहाडला पाहून क्षणमात्र दचकतो. ]

भिकोबा : माफ करा हं !...आपल्या कामात व्यत्यय... ( नाही ना आला ? )
काला पहाड : चूप ! ( पिस्तुल रोखतो. )
भिकोबा : सॉरी... चालू द्या...चालू द्या तुमचं काम ... हॅ हॅ !... नमस्कार ! ( हात जोडतो. )
काला पहाड : चूप !
भिकोबा : अरेच्या ! रागावता कशाला ? नमस्कार तर कराल ? हवं तर मी पिस्तुल धरतो... हॅ हॅ ! . नमस्कार.
काला पहाड : चूप !
भिकोबा : चूप तर चूप ! आपलं काय जातं ? पण तुम्ही काही बोला की ! आपण...( कोण ? )
काला पहाड : ( ओरडून ) चूप !
भिकोबा : अरेच्या ! 'चूप' शिवाय दुसरं काही बोलतच नाही तुम्ही. चूप बसायला नाही कोण म्हणतंय् ! पण नाव तर सांगा तुमचं. आपण कोण, इतक्या रात्रीचं इकडे येणं का केलंत—
काला पहाड : आता जास्त बोलशील तर गोळी झाडीन !
भिकोबा : हॅ हॅ !...कशाला फुकट घालवताय गोळी ? आपण कोण आहात हे तर सांगा आधी !
काला पहाड : कशाला ?
भिकोबा : नाही—म्हणजे कुणाची गोळी खाऊन मेलो ते तरी कळेल ... ठीक आहे. तुम्ही सांगत नाही तर मी सांगतो माझं नाव. मी भिकोबा सावकार. या वाड्याचा अर्धा मालक. दुसरा अर्धा मालक आमचे चुलते. चाचा सावकार !...आता भिकोबा सावकार असं मी नाव सांगितलं तर वाटतं, मीच माझा बाप असेन म्हणून ! पण माझं वय आहे बत्तीस. शिक्षण— बी. ए. पास.. आता आपली माहिती—
काला पहाड : मी आहे काला पहाड !
भिकोबा : शिक्षण ?

काला पहाड : ( पिस्तूल दाखवतो.) एवढंच !—कळलं ?

भिकोबा : हो ! ( एकदम उडी मारतो.) नाव काय म्हणालात ? काला पहाड ? म्हणजे पेपरमधे हल्ली नाव येतं—

काला पहाड : हो. तोच मी. प्रसिद्ध दरवडेखोर ! काला पहाड ! !

भिकोबा : सो व्हेरी ग्लॅड टु मीट् यू !... मिस्टर, ते पिस्तुल जरा बाजूला ठेवता का ? मला तर तुम्हांला मिठी मारावीशी वाटत्येय् ! काला पहाड, मी स्वप्नात तर नाही ना ? तुम्ही मला खरंच भेटता आहात ? तुम्हाला भेटायची फार फार इच्छा होती माझी. तुमच्याबद्दल खूप वाचलंय् मी. ( आनंदाने ) वा: वा: वा: ! तुम्ही खरंच आहात ना काला पहाड ? की आपले आम्हांला गंडवताय् ? ...काला पहाड म्हणजे साला कमाल झाली ! तुम्हांला कुठं ठेवू आणि कुठं नको असं झालंय् ! वाटतं, तुम्ही इथून जाऊच नये. इथंच राहावं ... मनाला येईल तेव्हा चोऱ्या कराव्यात, आम्हांला त्या गोष्टी सांगाव्यात—

काला पहाड : आवाज बंद ! आता मी गोळी मारल्याशिवाय राहणार नाही.

भिकोबा : कशाला – कशाला ? अहो, ही बंदुकीची गोळी म्हणजे महाग असणार खूप. काय पडतं हो एका गोळीला ?

काला पहाड : ( चिडून ) एक माणूस पडतो ! कळलं ? माझा नेम पक्का आहे !

भिकोबा : हॅ हॅ !...पक्का म्हणजे ? असणारच ! काला पहाड म्हणजे काय चेष्टा आहे ?

काला पहाड : अशी बकवास करणाऱ्याला मी पहिले छूट गोळी मारतो !

भिकोबा : अर्थातच !...पण मी काऽही करणार नाही तुम्हांला... बरं, इकडे यायचं कारण—

काला पहाड : दिसत नाही ? मी ही तिजोरी फोडायला आलोय्.

भिकोबा : आता म्हणजे कमालच केलीत ! ही तिजोरी फोडाच तुम्ही !... तुमच्याशिवाय दुसऱ्या कुणालाच जमणार नाही हे ! पण जरा गप्पाबिप्पा माराल की नाही ? इथं असे सोफ्यावर बसा जरा. थकला असाल ! कुठून आलात तुम्ही ?

काला पहाड : चूप ! मी काही सांगणार नाही.

भिकोबा : मर्जी तुमची!...बरं, गोळ्यांबद्दल काय सांगत होतात? या गोळ्या खूप महाग असतात काय हो? आणि परमीटवरच मिळत असणार. कशा-डझनावर मिळतात ह्या? डांबराच्या गोळ्यांसारख्या?

काला पहाड : तू गप्प बसणार आहेस की नाही?

भिकोबा : काय बुवा, तुम्ही कमालच करता! तुम्हांला पाहून मला किती आनंद झालाय्—तुम्हांला कळणार नाही. अगदीच अचानक आलात! आधी जरा कळवून तरी यायचं! कुठून आलात?

काला पहाड : खिडकीतून! कळलं?

भिकोबा : वाटलंच मला! म्हणजे काय झालं, कुणीतरी आल्यासारखं वाटलं मला. माझी कल्पना झाली, शेजारचे लुकतुकेच आले आहेत. ते केव्हाही येतात पैसे उसने मागायला. शीः! आपल्याला नाही आवडत असं. त्यापेक्षा च्चक्क चोरी करावी म्हणतो मी—तुमच्यासारखी! काय?

काला पहाड : चूप!

भिकोबा : हं!...इथं आलो तर तुमचं दर्शन घडलं! अहो, म्हणजे डोळ्यांवर विश्वासच बसेना! एवढा प्रसिद्ध पुरुष आमच्या जुन्या वाड्यात पायधूळ झाडतो—

काला पहाड : आता एक अक्षर बोललास आणखी, तर—

भिकोबा : पण मिस्टर काला पहाड, आपण जरा बोलत बसलो तर?... त्याचं काय आहे, इथं बोलायला चांगली कंपनीच नाही. धाकटी बहीण यमुना—ती सारख्या कादंबऱ्या वाचीत असते—डिटेक्टिव्ह. चाचा सारखे नाटकं लिहीत असतात. आमचा राज—

काला पहाड : राज? कोण राज?

भिकोबा : कोण राज काय? नुसता राज! आपला राजकपूर नाही! राज म्हणजे आमचा नोकर. तो अख्खा दिवस सिनेमाच्या अंधारात असतो. बरं, इथं बसणार का आता?...बसा ना, या सोफ्यावर बसा...आता ते काही चालणार नाही. (पुढं जाऊन काला पहाडचा हात धरतो. त्याला बळेबळेच सोफ्यावर बसवतो. काला पहाड नर्व्हस्!) हं!...अस्सं.

काला पहाड : हा काय मूर्खपणा! माझं काम करू दे मला. तुझ्या मनात दगलबाजी असली तर —

भिकोबा : अगदी तुमची शप्पथ ! काही दगलबाजी नाही. खूप दिवसांत गप्पा मारायला कुणी मिळालं नाही, म्हणून म्हटलं. बोला ! राहायला कुठं असता ?

काला पहाड : मसणात.

भिकोबा : अच्छा !... ( जराशानं दचकून ) आँ ? काय म्हणालात ? मसणात ? अरेरे ! मग इथं येऊन का राहात नाही ? बाहेरच्या औट हाउसमध्ये करू का तुमची व्यवस्था ?... जागेचा प्रॉब्लेम तुम्हांलासुद्धा आहे ना ? कमाल झाली ! काला पहाड, तुम्ही अर्ज का नाही करीत गव्हर्मेंटकडे ? तिकडे कलानगरमध्ये निरनिराळ्या क्षेत्रांतल्या कलावंतांना स्वस्तात प्लॉट मिळतो. तुमच्यासारख्या कलावंताला तर...

काला पहाड : मला उशीर होतोय्. तिजोरी फोडायची आहे !

भिकोबा : ती फोडणं कठीण आहे हं ! सांगून ठेवतो. म्हणजे आमची तिजोरी म्हणून नाही सांगत, पण तिचं कुलूप जर्मन मेकचं आहे. वडिलांनी ते मुद्दाम—

काला पहाड : तुझ्याकडे किल्ल्या असतील तर दे लौकर !

भिकोबा : हे काय विचारणं झालं ? असत्या तर दिल्या नसत्या का ? तुम्हांला इतके श्रम देण्यापेक्षा... काय हो, तुम्हांला ह्या व्यवसायात विश्रांती अशी नसणारच ! नाही ?

काला पहाड : ( बावचळून ) छट् ! कुठली विश्रांती आणि कसलं काय !

भिकोबा : ( गहिवरून ) हो. म्हणजे दर रात्री जागायचं... त्यापेक्षा तुम्ही दिवसा हा व्यवसाय का करीत नाही ?... बाकी सवयीवर अवलंबून असणार... ( हे बोलणं चालू असतानाच राज चोरट्या पावलांनी येतो. ) काय राज ? [ काला पहाड पिस्तुल रोखतो. ]

राज : कुठं काय ? पिक्चरला गेलो होतो. थर्ड शोला. जरा टाइम झाला. ( काला पहाडकडे बघतो. ) हा कोण ?

भिकोबा : अरे ! सांगायचंच राहिलं ! ह्यांना ओळखलंस तू ?

राज : नो ! स्टंट पिक्चरमध्ये रोल करतो का हा ? पाह्यल्यासारखा दिसतो हा. म्हणजे ' तुफान–इ–दर्या 'तला डाकू जग्गा—

काला पहाड : चूप ! फुकट मरशील !

राज : च्या मारी ! एकदम पिक्चर ! काय ॲक्टिंग ! !

भिकोबा : राज, हे ॲक्टिंग नाही हं. तू ‘काला पहाड’ नाव ऐकलं आहेस? तेच हे काला पहाड. फार मोठमोठ्या ठिकाणी ह्यांनी चोऱ्या केलेल्या आहेत. सगळं पोलीसखातं ह्यांना घाबरून आहे. एवढा मोठा माणूस आपल्याकडे आलाय्— त्यांची काही सरबराई—

राज : ऑं? डिक्टो काला पहाड दिसतोय्! (भिकोबाच्या कानात) साहेब, धरायचा ह्याला?

काला पहाड : दगाफटका करशील, तर ठार करीन!

भिकोबा : पहाडसाहेब, ह्याचं काय मनावर घेता? — राज, आलेल्या पाहुण्यांना असं धरायचं नसतं. अरे, आपलं नशीब थोर म्हणून असल्या रत्नाचे पाय पाह्यला मिळाले आपल्याला. आता असं कर, आत जा आणि चटकन—

काला पहाड : खामोष!

भिकोबा : राज, आत जा आणि काला पहाडसाठी चहा करून आण झक्पैकी! मलादेखील आण अर्धा कप. पहाडसाहेब, आपण चहा घेता ना? की कॉफी सांगू?

काला पहाड : हे काय चाललंय्? मला चहाबिहा काही नको. माझं काम—

राज : (भिकोबाला) साहेब, ह्यांचं काय काम आहे?

भिकोबा : (कौतुकानं) अरे, आपली तिजोरी फोडायला मुद्दाम आले आहेत ते एवढ्या लांबून.

राज : ती तिजोरी हा फोडणार?

भिकोबा : मग? चेष्टा नाही! तुझ्या बापानं तरी कधी फोडली होती ती तिजोरी?

राज : फादरनी फोडली असती, तर मोठ्या साहेबांनी त्यांचं हाड तरी शिल्लक ठेवलं असतं का? आज जर मोठे साहेब असते, तर ह्या काला पहाडचं हाडन् हाड साफ करून ठेवलं असतं! तुम्ही आपले असेच!

भिकोबा : (काला पहाडला) तुम्ही ह्याला चूप म्हणताय् की मी म्हणू?

काला पहाड : चूप!

भिकोबा : हां! आस्सं!

राज : साहेब, तो तुम्हांला चूप बोलला.

काला पहाड : चूप!

भिकोबा : (राजला) बघ, तुलाच चूप—

काला पहाड : चूप ! तुम्ही दोघे बसून राहा इथं ! हलायचं नाही. मी तिजोरी फोडणार आहे. जरा जरी गडबड केलीत तर गोळी घालीन एकेकाला !

भिकोबा : राज, फुकट दोन गोळ्या जातील बघ त्यांच्या ! आत जाऊन पटकन चहा आण. काला पहाड, चहा घेऊ आणि मग तुम्ही लागा कामाला. मलादेखील बघायचं आहे तुमचं कसब ! काय हो, ह्या धंद्याला प्रॅक्टिस बरीच लागत असेल नाही ?... हां ! पण प्रॅक्टिस एकदा चालू झाली की पाह्यला नको, नाही ?... धंदा करण्यासारखा आहे. समजा, मी ठरवलं हा धंदा करायचा–

काला पहाड : तर थोबाड बंद करून ठेवावं लागेल.

राज : कंप्लीट मशीन मारून घ्यावं लागेल बाटाकडून !

काला पहाड : तू चूप राहा ! इथं बसून राह्यचं !

राज : पण चहा—

काला पहाड : हलू नकोस. ठार करून टाकीन !

भिकोबा : पहाडसाहेब, तुम्ही फारच संकोच करता बुवा. राज, जा बाबा चहा करून आण.

काला पहाड : अरेच्या ! काय डोकंबिकं फिरलंय् की काय तुमचं ? दगलबाजी झाली तर—

भिकोबा : काय बिशाद आहे ! तुमच्या केसाला जरी धक्का लागला, तरी हा भिकोबा ऐकून घेणार नाही ! आज ती तिजोरी फोडल्याशिवाय तुम्हांला सोडणार नाही आम्ही... राज, अरे चहा आण. ह्यांनी जरा गंमत केली तुझी. ( काला पहाडच्या दंडाला हात लावतो. ) काय, खरं की नाही पहाडसाहेब ?... ऑं ?... कसले दंड आहेत हो तुमचे ! लहानपणापासून व्यायाम घेत असाल. नमस्कार, बैठका—

राज : दंडसुद्धा ठाऊक असेल त्याला !

भिकोबा : चूप ! चहा आण आधी. त्यांना उशीर होतोय् ( राज जातो. ) पहाडसाहेब, उशीर झाला तर तुम्हांला मी पोचवीन आमच्या गाडीनं. मग झालं की नाही ? बसा जरा स्वस्थ .. हं ! काय म्हणताय् ? आज हवा जरा बरी आहे, नाही ?... काल रात्री फार उकडत होतं. झोपच येईना मला .. तुम्हांला—तुम्हांला काय, रोजच जागरणं !... महिन्याला किती नाइट्स् असतात हो ?

काळा पहाड : म्हणजे ?

भिकोबा : महिन्यातून किती रात्री अशी जागरणं असतात ?

काळा पहाड : ते काही ठरलेलं नाही. वर्दी लागली, की धाड घालायची.

भिकोबा : बाकी कुठलाही धंदा घ्या. आजकाल काही विश्रांती नाही. सारखे कष्ट कराल तेव्हा पैसा मिळणार. म्हणजे मी आपला बेकारच आहे, पण देशाचा एकंदरीनं विचार केला, तर आयुष्य मोठं जिकिरीचं झालंय्.

काळा पहाड : ( गोंधळतो. ) काय करायचं त्याला ?

भिकोबा : काही नाही. वर्षातून एक महिना कुठंतरी हवेच्या ठिकाणी जाऊन विश्रांती घ्यायची. तुमच्यासारख्यालाच तर फार आवश्यकता आहे विश्रांतीची. बायकामुलांना घेऊन खुशाल महिनाभर जायचं बाहेरगावी. धंद्याचं वाटेल ते होऊ दे म्हणायचं ? काय... बायकोमुलं किती तुम्हांला ?

काळा पहाड : तीन पोरं आहेत.

भिकोबा : व्हेरी गुड ! कशी आहेत पोरं ? वडलांचे गुण घेतले आहेत, की नाहीत ?

काळा पहाड : वा: ! मोठा पोरगा बारा वर्षांचा आहे. त्यानं परवा चेन चोरून आणलीन् एक नि माझ्यापुढं धरलीन्. मी चेन बघितली आणि एक फाइट दिली नाकाडावर !

भिकोबा : अरेरे ! त्याच्या गुणांचं कौतुक करायचं, तर —

काळा पहाड : कौतुक ? साल्याला अजून सोन्याची चेन आणि पितळेची चेन कळत नाही !

भिकोबा : होते चूक ! लहानच आहे अजून. मोठा होऊ दे. मग बघा !... तीन पोरं म्हणालात, नाही का ? म्हणजे इतके सगळे रात्रीचे व्याप संभाळून... खरंच विशेष आहे ! तुमचा विषय निघतो अधूनमधून आमच्याकडे. आमच्या यमूला डिटेक्टिव्ह कादंबऱ्यांत गोडी ! .. विषय निघाला, की मी नेहमी म्हणतो — 'काळा पहाड म्हणजे खास आहे !' ... ( चुटकी वाजवतो. ) काळा पहाड, एक कल्पना सुचलीय !

काळा पहाड : दगाबाजी केलीस, तर याद राख !

भिकोबा : ते तुम्ही स्वप्नातदेखील आणू नका. बाकी तुम्हांला कुठली म्हणा स्वप्नं पडायला ! काय ? ... हां ! तर पहाडसाहेब, कल्पना अशी आहे —

आत्ता यमूला इथं बोलवायचं...

काला पहाड : मतलब ?

भिकोबा : उद्या सकाळी तिला मी सांगितलं, की काला पहाड आपल्या वाड्याला भेट देऊन गेले, माझ्याबरोबर त्यांचं चहापान झालं, तर ती चिडेल. तर कल्पना अशी — मी तिला इथं बोलावून आणतो. तिला फार गंमत वाटेल. इथं खुर्च्या टाकून आम्ही तुमचं कसब बघत बसू.

काला पहाड : आता जर कुणाला इकडे आणलंत, तर पाहा !

भिकोबा : असं नका म्हणू बुवा ! अहो, ती घरचीच आहे. निदान तिला तरी परवानगी द्या यायची — नाही—नाही. तुम्ही दिलीच पाहिजे परवानगी ! ...मी आत्ता जाऊन आणतो तिला.

काला पहाड : आणि मी काय एकटा राहू इथं ? तू जायचं नाहीस इथून !

भिकोबा : हॅ: हॅ: ! भ्यायचं काही कारण नाही. मी आत्ता येतो.

काला पहाड : जायचं नाही !

भिकोबा : मग हाक मारू तिला ? ( हाक मारतो. ) यमूताईऽ ! ...ए यमूऽ ! लौकर इकडे ये तिजोरीकडे...इथं कोण आलंय् बघ तरी एकदा !

काला पहाड : आवाज करू नकोस.

भिकोबा : पहाडजी, तुम्ही पाहा तिला एकदा. इतकी हुशार आहे ! ... मॅट्रिक झालीय्. पण वाचन काय आहे ! अर्नाळकर सबंध कोळून प्याली आहे... अरेच्या ! चहा प्यायचा राहिला आहे, नाही ? ( हाक मारतो. ) राज, चहा आण लौकर. पाहुण्यांना घाई आहे.

काला पहाड : ओरडू नकोस. घोट घेईन नरडीचा !

भिकोबा : अंहं ! तुम्ही चहाचाच घोट घ्या ! ( हाक मारतो. ) यमू !... यमूताई ! ..

काला पहाड : पण यमूताईंना कशाला त्रास देताय् एवढ्या रात्री ?

भिकोबा : वा ! हे काय बोलणं झालं ? तुम्ही काही नेहमी येणारे नाहीत. आज आता तिजोरी रिकामी करून गेलात, की पुन्हा कशाला येणार तुम्ही गरिबा-कडे ?...यमू जागीच असेल वाचीत...यमूऽ !...

[ राज चहा घेऊन येतो. ]

राज : साहेब, चहा.

भिकोबा : यमूताईला इकडे यायला सांग, जा.

[ राज जातो. भिकोबा चहा करून काला पहाडला देतो. ]

काला पहाड : ( चहा पितो. ) वा: ! झकास चहा आहे !

भिकोबा : आवडला ना ? आणखी आहे हं किटलीत. उगाच संकोच करू नका. तिजोरी उघडायची आहे अजून. जरा तरतरी हवी. काय ?

काला पहाड : मला — मला–तुझ्या बोलण्याचा संशय येतो.

भिकोबा : संशय ? कमाल आहे ! म्हणजे पोलिसांच्या वर तुम्ही संशयी दिसता ! काय हो, पोलिसांची तुम्हांला भीती वाटत नसेल, नाही ? मला फार वाटते. आत्ता तुम्हांला पकडायला जरी पोलीस आला ना, तरी मी भीतीनं मरून जाईन.

[ यमू येते. तरुण, लाडिक. तिच्या मागून राज येतो. यमू पातळ नीटनेटकं करते. ]

यमू : भिकूदादा—

भिकोबा : छान ! .. यमूताई, हे कोण आहेत, ओळखलंस का ?

यमू : इश्श्य ! नाही बाई !

भिकोबा : अग, हे आहेत सुप्रसिद्ध काला पहाड !

यमू : इश्श्य ! हो ? अरे, मग राजबरोबर नीट नाही का निरोप द्यायचा ? ( काला पहाडला ) माफ करा हं ! मी आपली अशीच वेंधळ्यासारखी कपडे करून आले.

काला पहाड : ऑं ? ...काही हरकत नाही...

यमू : इश्श्य ! नुसता चहा ? काला पहाड, तुम्ही थांबता ना जरा वेळ ? पोहेबिहे करून आणते.

काला पहाड : — न् — नको ... टाइम नाही.

यमू : इश्श्य ! ते काही चालायचं नाही. भिकूदादा, तूच सांग बाबा ह्यांना.

भिकोबा : अग, त्यांना खरंच घाई आहे. ते काय मोकळे आहेत का माझ्यासारखे ?

यमू : आणखी कुठं अपॉइंटमेंट घेतली आहे त्यांनी ?

भिकोबा : हो. शक्यता आहे.

यमू : आज इकडे कुठं चुकले हे ?

भिकोबा : जाता जाता आपली तिजोरी फोडायला आले आहेत.

यमू : इश्श्य ! खरंच ? अहो पहाड, तुम्ही आमच्यादेखत फोडणार ना तिजोरी ?

भिकोबा : अग, हे काय विचारणं झालं ? हज्जार माणसांच्यादेखत ते फोडू शकतील !

राज : काय ? खडी ?

काला पहाड : खामोष !

यमू : इश्श्य ! हे चोर खरंच 'खामोष' म्हणतात ? किती छान ! (स्वतःशीच) खामोष ! ए भिकूदादा, तू म्हणून बघ एकदा. किती मजा वाटते ? ...खामोष !

भिकोबा : खामोष !

राज : (जोराने) खामोष !

भिकोबा : राज, तुला बघायची असेल गंमत तर गप्प बसून राहा. नाहीतर बाहेर चालता हो ! — जा !

काला पहाड : बाहेर जायचं नाही कुणी !

यमू : खामोष !

काला पहाड : ऑं ?

यमू : इश्श्य ! मी सहज म्हटलं. तुम्ही भिऊबिऊ नका हं. नाहीतर गंमत येणार नाही तिजोरी फोडताना. काय हो पहाड, बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्य-मालेतला काला पहाड तुमचा कोण लागतो हो ?

काला पहाड : कुणी नाही.

यमू : इश्श्य ! म्हणजे दोन पहाड झाले काळे ! तुम्हांला तो अर्नाळकरांचा पहाड कधी भेटलाय का हो ?

काला पहाड : नाही.

यमू : पण तुम्ही दोघे भेटलात की कित्ती मजा येईल ! आम्हांला अशी मजा बघायला मिळाली पाहिजे.

काला पहाड : मी ओळखत नाही त्याला ! ...अरेच्या ! ही काय वटवट चालली आहे तुमची ? तुम्हांला गोळ्या घालू का एकेक ? मला टाइम झालाय. एवढ्यात दोन तिजोऱ्या फुटल्या असत्या !

यमू : इश्श्य ! तुम्ही लागा ना कामाला. मला असं कध्धी पाहायला मिळालं नव्हतं ! भिकूदादा, आपलं नशीब म्हणूनच असा मोठा माणूस आपल्याकडे

चालून आला. उद्या पेपरामधे बातमी देऊ हं आम्ही, 'सावकारांच्या वाड्यात काळा पहाड!'...पहाड, तुमचा एखादा फोटो द्याल का मला सही करून? ह्या डोळ्यांवरच्या पट्टीसकट हवा हं! काय हो, ही पट्टी कुठून शिवून घेता तुम्ही?

राज : टेलर ठरलेला असेल त्यांचा!

काळा पहाड : चूप!

यमू : इश्श्य! खामोष म्हणा ना! खामोष!

काळा पहाड : खामोष! (पिशवी उचलतो.) तुम्ही असा त्रास देत असाल, तर मी निघून जाईन.

भिकोबा : तिजोरी न फोडता?

काळा पहाड : हो.

भिकोबा : मी तुमचे पाय धरतो पहाड! आता आल्यासारखे तिजोरी फोडून जा ना! तिजोरी फोडण्याचं वचन दिल्याशिवाय मी हे पाय सोडणार नाही!

यमू : भिकूदादा, मागं आपल्या वाड्यात आलेल्या चोराला काळा पहाड दाखवायला हवे होते, नाही? (काळा पहाडला) अहो, त्याला ही तिजोरी फोडताच येईना!

काळा पहाड : मी दाखवतो फोडून. पण मधेमधे बोलाल, तर निघून जाईन.

यमू : हे काय हो? अशानं आम्ही नाही जा!

भिकोबा : यमू —

यमू : इश्श्य! नाहीतर काय! काळा पहाडशिवाय कुण्णाला उघडणारच नाही ही तिजोरी!...आणि बाबांनी इतकं जर्मनीचं कसलं कुलूप लावून घेतलं?... राज, इथं दोन खुर्च्या टाक बघू, मला आणि भिकूदादाला. मला तर वाटतं, इथं खुर्च्या टाकाव्यात. मित्रमैत्रिणींना बोलवावं आणि पहाडांचा एक घरगुती असा कार्यक्रम ठेवावा...इश्श्य! काळा पहाड, तुम्ही अशा एका घरगुती कार्यक्रमाचा काय चार्ज कराल?

काळा पहाड : तुमची डोकी आऊट झाली आहेत! मी जातो—

राज : नहीं काला पहाडजी, ऐसा नहीं हो सकता! तुम्ही तर 'देवदास'-मधल्या दिलीपसारखे 'मुझे कलकत्ता जाना ही पडेगा' म्हणताय्. आता आल्यासारखे एक प्रोग्राम करून जा. सस्पेन्स पिक्चरसारखा...तुम्ही 'गुम-

नाम ' पाहिलात ? हेलन काय दिसते त्यात !

काला पहाड : तुला गोळी खायचीय्? गप्प राहा !

यमू : इश्श्य ! खामोष म्हणा गडे !

[ बाहेर दरवाजांवर थापा ऐकू येतात. भिकोबा ' पोलीस ' म्हणून हळूच किंचाळतो आणि घाबरून काला पहाडला धरतो. ]

भिकोबा : काला पहाड, पोलीस दिसताहेत. आता काय करायचं आपण ? लपायचं का कुठं ?

यमू : इश्श्य ! पोलिसांनी सगळ्या गमतीचा विरस केला !

[ काला पहाड पिस्तुल सरसावतो. चुकून भिकोबाला पाठीशी घेऊन ' भिऊ नको ' म्हणतो. दरम्यान राज बाहेर जातो. क्षणभरानं परत येतो. त्याच्याबरोबर लुकतुके. मध्यमवयीन. पेशानं कारकून दिसतात. ]

यमू : राज, कोण रे ? इश्श्य ! लुकतुकेकाका ! ! आम्ही काय घाबरलो—पोलीस समजून !

भिकोबा : ( भीती पळाली आहे. ) कोण ? लुकतुके ? या या !...

लुकतुके : कसली मीटिंग भरलीय् ?

यमू : इश्श्य ! मीटिंग कसली ? हे कोण आहेत, पाहिलंत का ?

लुकतुके : कोण ? ( काला पहाड पिस्तुल रोखतो. ) म्–माफ करा... म्ह... म्हणजे . मी...मला... म्हणजे...म्हणजे काही...

भिकोबा : अंहं ! भिऊ नका. आपले दोस्त आहेत हे आता. तुमची–त्यांची ओळखच करून देतो. हे मिस्टर काला पहाड.

लुकतुके : क्–काला पहाड ? म्हणजे हल्ली पेपरमधे ( पुन्हा घाबरतात. )

भिकोबा : हो. तेच हे सुप्रसिद्ध काला पहाड . आणि हे आमचे लुकतुके ! इकडे जवळच राहतात . पी. डब्ल्यू डी. त हेडक्लार्क आहेत.

लुकतुके : म्हणजे मिस्टर...पाला कहाड, आम्ही...हेडक्लार्क म्हणजे तसं...तसं स्केल कमीच – पगाराचं. पण नाव आपलं हेडक्लार्क ... म्हणजे गरीबच आहोत. हल्लीच्या महागाईत–तुम्हांला कल्पना असेलच, – पगार पुरत नाही... अगदी खूप...चिक्कार गरीब आहोत आम्ही. नाहीतर म्हटलं

असतं, एखाद्या दिव...आपलं रात्री आमच्या घरी या म्हणून . हॅ हॅ!... तुम्ही कशाला गरिबाकडे याल ? तुम्ही जाणार सावकारांसारख्या श्रीमंतांकडे.

काला पहाड : कुठं राहता तुम्ही ?

लुकतुके : कुठं राहतो ? (खूप घाबरून) वा ... राहतो ना!... हॅ! राहतो कुठला ? आपला असाच... म्हणजे साधारण ह्या ... नाही, आपल्या त्या दिशेला...इकडे तुम्हांला माहीत आहे... घारपुरे – खूप श्रीमंत...देशमुख – तेही तसेच श्रीमंत. क्लास वन् ऑफिसर्स .. फोर फिगर सॅलरीवाली माणसं... त्यांच्याकडे तुम्ही गेलाच असाल... त्यांच्या बंगल्यांच्या पुढं आपले आम्ही... राहतो कसले म्हणा! आपलं... हां!... आणि घरात माणसं खूप आहेत. खूप...चार मेव्हणे...गलेलठ्ठ आहेत. फुकट खायचं, रात्रभर पत्ते खेळत जागायचं...मारामाऱ्या करायच्या...

भिकोबा : कुठले मेहुणे आणि काय! कोण हो करतात मारामाऱ्या ? उगाच काहीतरी!. . .

काला पहाड : मारामाऱ्या ?

लुकतुके : हो. म्हणजे तसं आपलं... म्हणजे पाला कहाडसाहेब, तुमच्यासारखं नाही. आपले.. रात्री कधीतरी दहाबारा खून, सातआठ मारामाऱ्या करतात.

काला पहाड : बकवास बंद! पिस्तुल पाहिलंस ?

लुकतुके : आम्ही कुठले... म्हणजे इतक्या जवळून पिस्तुल...

काला पहाड : भिकोबा, मी जातो. तुम्ही सगळे हरामखोर—

यमू : इश्श्य! हे काय ? मी कशाला थांबले मग इतकी ? अं ऽ ...तुम्ही गडे तिजोरी फोडल्याशिवाय—

लुकतुके : हे...हे पाला कहाड तिजोरी फोडायला...पण हे लर्मन मेक्चं जॉक... आपलं—जर्मन मेकचं लॉक...असू दे...असू दे. मी जातो भिकोबा. सहजच आलो होतो. जरा बाहेर येता ?

भिकोबा : काय ?

लुकतुके : नाही—म्हटलं जरा बाहेर येता ? काही खाजगी बोलायचं आहे.

काला पहाड : खाजगी नाही!

लुकतुके : साहेबांची शप्पत! खरंच खाजगी आहे. भिकोबा, येता बाहेर ?

काला पहाड : बाहेर जायचं नाही! इथंच बोल!

यमू : इश्श्य ! खामोष—

लुकतुके : पण...पण...

काला पहाड : ( पिस्तुल रोखतो. ) खामोष ! बोल लौकर !

लुकतुके : ( एका दमात, घाबरून ) भिकोबा, दहा रुपये उसने हवे आहेत. एक तारखेला परत करीन. शिर्क्यांना द्यायचे आहेत आत्ताच्या आत्ता !

भिकोबा : किती वाजले आहेत, पाहिलंत ? एक वाजून गेला रात्रीचा. आत्ता कशाला पैसे हवे आहेत ? काय हो, काला पहाड, ही काय रीत झाली ? तुम्ही कधी असा मनुष्य पाहिला आहे—रात्री एक वाजता दहा रुपये मागणारा ?

लुकतुके : त्याचं असं झालं, आम्ही रमी खेळत होतो. मी आणि शिर्के. मी आधी भराभर जिंकत गेलो, आणि मग जो तडाखा बसला की नाही !— बत्तीस रुपये हरलो. खिशात बावीस रुपये. शिर्के ऐकेना. म्हणाला, ‘ आत्ताच्या आत्ता पैसे हवेत. ’ मग काय करणार ?... देता दहा रुपये ? बाहेर शिर्के उभा आहे. हवं असेल तर त्याला बोलावून तुमची खात्री करून देतो. जाऊ बोलवायला ?

काला पहाड : खबरदार, कुणी बाहेर जाल तर !

लुकतुके : पण तो शिर्के—

काला पहाड : गोळी मार त्याला !

भिकोबा : जरा पिस्तुल देता लुकतुक्यांना ?

यमू : इश्श्य ! लुकतुकेकाकांचा काही नेम नाही. ते खुश्शाल शिर्क्यांना गोळी घालतील !

काला पहाड : चूप ! ( यमूकडे बघतो. ) खामोष !

लुकतुके : भिकोबा, दहा रुपये—

भिकोबा : लुकतुके, आत्ता काही मला वेळ नाही. इथं हे पाहुणे आलेले बघताय ना तुम्ही ? हां ! असं करू !—काला पहाड, तिजोरी उघडल्यावर ह्या लुकतुक्यांना तुमच्या हस्ते त्यातले दहा रुपये देऊ. चालेल ?

काला पहाड : बेवकूफ ! एक दमडी देणार नाही !

लुकतुके : ठीक आहे. जातो मी.

काला पहाड : तुला गोळी घालीन, बाहेर गेलास तर !

लुकतुके : काला पहाड, तुम्ही दहा रुपये दिलेत, तरच आत थांबतो. नाहीतर

जातो.—हो. म्हणजे...

राजा : लुकतुके, तुम्हांला सेफ उघडेपर्यंत टाइम नाही का?

लुकतुके : पण तो शिर्क्या—

काला पहाड : खामोष ! (पिस्तुल रोखतो.)

लुकतुके : काफ मरा... आय मीन माफ करा... मला गेलंच पाहिजे.

काला पहाड : बाहेर नाही जायचं म्हणून सांगितलं ना ?

लुकतुके : पण मग दहा रुपये...

भिकोबा : काय तुम्ही तरी काला पहाड ! देऊन टाका ना त्यांना दहा रुपये. ते ते थांबतील इथं.

[ काला पहाड लुकतुक्यांना कुरकुरत दहा रुपये देतो. ]

लुकतुके : थँक्यू... ह्या फर्स्टला परत करीन मी. तुमचा पत्ता देऊन ठेवा तेवढा.

राज : काला पहाड, ॲड्रेस द्यायचा नाही हां ! फुकट पोलिसांचं बक्षीस पटकवतील लुकतुके.

काला पहाड : लुकतुके, इथं बसून राहा.

यमू : इश्श्य ! इतकं म्हणताहेत तर थांबा ना लुकतुकेकाका... आत्ता तिजोरी उघडण्याचं प्रात्यक्षिक... इश्श्य ! काला पहाड, तुम्ही एकदा आमच्या भगिनीसमाजात याल का हो प्रात्यक्षिक दाखवायला? याच गडे ! सगळ्या बायकांना गंमत वाटेल. तुमचा जायचायायचा टॅक्सीचा खर्च, चहापाणी, आणि तुम्ही तो माफ केलात, तर मोठा गुच्छ देऊ तुम्हांला. याल ना ?

काला पहाड : खबरदार ? आता बोलेल त्याला ठार करीन मी ! (मनगटावरल्या घड्याळात बघतो.) ऑं? एक वाजून पन्नास मिनिटं ?

भिकोबा : पुढं दिसतंय् तुमचं घड्याळ.

राज : (आपल्या घड्याळात बघतो.) रेडिओ—टाइमप्रमाणं तुम्ही घड्याळ लावा काला पहाड. रेडिओ ऐकायला टाइम मिळतो का तुम्हांला ?

काला पहाड : (पिस्तुल रोखतो.) आता कुणी आवाज करायचा नाही. मुकाट्यानं बसायचं. (काला पहाड तिजोरीकडे जातो. यमू त्याच्या मागून त्याची पिशवी घेऊन जाते. भिकोबा त्या पिशवीतली बॅटरी घेऊन मदतीसाठी जातो.) बसा तिकडे. बत्तीच्या लाइटमध्ये साला बॅटरी धरतो !

[ काला पहाडचं काम चालू झाल्यावर प्रत्येक जण पुढंपुढं सरकतो. सगळी तटस्थपणानं 'मौज' बघतात. इतक्यात बाहेरून शिर्के हाक मारतात. ]
'लुकतुकेऽ !...अहो लुकतुकेऽ !'
लुकतुके ओ देण्याचा प्रयत्न करणार, इतक्यात काला पहाडने रोखलेले पिस्तुल पाहून गप्प होतात. शिर्के टाळ्या वाजतात. 'अहो लुकतुके, अहो सावकार' म्हणून ओरडतात. आतल्या खोलीतून चाचा सावकार येतात. परस्पर बाहेरच्या दरवाजाकडे जाताना वाटेत थबकतात. दालनात बघतात—सर्व मंडळी खुर्च्यांवर तटस्थ बसलेली. ते आत येतात. चाचा सावकार : वय वर्षं पन्नाशीजवळ. लहरी. ]

चाचा : भिकोबा, रात्रीच्या या उत्तरप्रहरी कसला मनसुबा चालू आहे ?

काला पहाड : ( चटकन पिस्तुल रोखतो ! ) खामोष !

चाचा : आपण ? वाहवा ! आपल्या नेत्रकमलांना काही इजा तर पोचलेली नाही ना ? कारण की, त्यांवर लावलेली ही पट्टी—

काला पहाड : मी काला पहाड आहे, समजलं ?

चाचा : नाही खाविंद ! हे विचित्र नाव धारण केल्यामुळं मला कसा बरं उलगडा व्हावा ? आपण कुठल्या मोहिमेवर निघाला आहात ?

काला पहाड : भिक्या, हा इंग्रजीत-बिंग्रजीत बोलतोय् काय ?

भिकोबा : ( काला पहाडला ) अंहं !...तुमची ओळख करून देतो. चाचा, हे सुप्रसिद्ध गुन्हेगार आणि डाकू 'काला पहाड'. आणि पहाडसाहेब, हे आमचे चाचा. नाटककार चाचा सावकार.

चाचा : हिरोजी फर्जंद, बापू गोखले, पानपतचे भाऊसाहेब ...

काला पहाड : चूप ! कुणाला हाक मारलीस. तर नरडीचा घोट घेईन !

यमू : इश्श्य ! अहो खामोष, चाचांनी हाका नाही मारल्या. त्यांच्या नाटकांची नावं सांगितली.

भिकोबा : पहाडसाहेब, नाव झाल्यावर डिग्रीसारखी नाटकांची सगळी नावं सांगण्याची त्यांची पद्धत ...

चाचा : अलबत् !...दत्ताजी शिंदे, दादाजी कोंडदेव इत्यादी नाटकांचा कर्ता—चाचा सावकार ! काला पहाड, पुन्हा ते वाक्य म्हणा—'कुणाला हाक मारलीस, तर नरडीचा घोट घेईन !' काय वजन आहे आवाजाला ! म्हणा.

पुनश्च म्हणा! या कर्णपिंपुटात साठवू देत ते शब्द! आऽहा! काला पहाड, नाटकाचं नाव मिळालं!...द्या—आधी टाळी द्या!

राज : चाचाजी, टाळी कसली—गोळी मारतील ते!

चाचा : 'नरडीचा घोट!' तीन–अंकी ऐतिहासिक दणदणीत—

भिकोबा : पराभव!

चाचा : भिकोबा! इथपर्यंत तुझ्या मूर्खपणाची मजल जावी अं? अरे, नुसतं नाव ऐक : 'नरडीचा घोट!'

यमू : चाचा, इश्श्य! नाटकाचं नाव नऊ—अक्षरी लागतं ना हल्ली?...मग असं करा : 'खामोष, नरडीचा घोट!' काला पहाड, तुम्ही त्या नाटकात काम कराल? चाचा, काला पहाड काम करणार म्हणजे नाटकाला केवढी गर्दी जमेल, नाही?

राज : पोलिसांची?

चाचा : काला पहाड, तुम्ही नाइटला काय घ्याल?

लुकतुके : एक तिजोरी तरी लागेल त्यांना!

काला पहाड : चूप!

यमू : अं ऽ ऽ—खामोष!

काला पहाड : खामोष! साले चक्रम लोक भरलेयत इथं! नाटकं लिहितो साला! एक अक्षर समजत नाही काय बोलतो! साली एक रात्र मोफत गेली! ...(जायला निघतो.)

भिकोबा : काला पहाड, जाऊ नका. आमचा गुन्हा पदरात घ्या. चाचांच्या बोलण्याचा अर्थ—

चाचा : काला पहाड, माझ्या बोलण्याचा मथितार्थ आपल्या ध्यानी नाही का आला?...वा! ह्या भाषेची आणि तुमची जानपहेचान करून द्यायची, तर त्यासाठी मी एक नाटकच तुम्हांला वाचून दाखवतो आत्ता.

यमू : इश्श्य! हे काय चाचा? अशानं काला पहाड निघून जातील!

चाचा : ठीक आहे पोरी! निदान एखादं स्वगत तरी ऐकाल का काला पहाड? 'सिंहगडचा छावा' मधलं आहे. तानाजी गेल्यानंतर त्याचा भाऊ सूर्याजी बोलतो. सगळं सैन्य पळून जातं त्यांना उद्देशून! (आवाज लावतात.)... अरे, पळता काय! देहाच्या कणाकणानं लढणारा तुमचा तानाजी इथं पडला

आहे. त्याच्या रक्ताची शपथ आहे तुम्हांला. (वरच्या आवाजात)—थांबा! जाऊ नका. इथं शत्रू पाय रोवून उभा आहे, आणि तुम्ही पाय लावून पळता? शिर्के, मागं फिरा! . शिर्के...

[ शिर्के बाहेरून 'ओ' देतात. ]

काला पहाड : खामोष! नाटक बंद ठेव. तिजोरी उघडायची आहे, तर नाटक दाखवतोय करून!—गोळी खायचीय्?

भिकोबा : चाचा, हे काला पहाड तिजोरी उघडायला म्हणून मुद्दाम आले आहेत.

राज : काय चाचासाहेब, तुम्ही तरी! चांगली सेफ उघडून मिळत्येय्, तर ड्रामा म्हणून तुम्ही हाकलताय् त्याला!

काला पहाड : चूप!

यमू : इश्श्य! चूप काय येताजाता? काय हो, घरी बायकांमुलांशी बोलताना तुमचं सारखं 'चूप चूप'—

भिकोबा : चूप! चाचा, नाटक वाचण्यापेक्षा 'काला पहाड' वर एक नाटक लिहा ना!

राज : हां! एकदम सस्पेन्स पिक्चर होऊन जाईल.

चाचा : काला पहाड, आपणास नाटकाची आवड?

काला पहाड : चूप रे! मला नाटकबिटक काही नको! आधी माझं काम!

चाचा : वा! लाख बोललात महाराज! अंगीकृत कार्यात येणारी संकटांची परंपरा—त्यांची तमा न बाळगता आणि क्षणोक्षणी भेटणारे मोहांचे मेरू पर्वत ओलांडून तुम्ही जो उपदेश केलात, तो ऐकून आमची छाती अभिमानानं फुगून आली आहे... महाराज, आम्ही इथं गनिमांसाठी मोर्चे बांधून तयारीत राहतो. तुम्ही कार्याला प्रारंभ करा. आपल्याला लागणारी सर्व कुमक...भिकोबा, बघतोस काय? तो दिवा हाती घे...बॅटरी रे! आणि महाराजांना गुहेचा रस्ता दाखव... महाराज, प्रसंग बाका आहे. रात्र टळत आहे. शुक्र तारा अस्मानात उगवत आहे...

काला पहाड : चूप! (जायला निघतो.) मरा तुम्ही इथं!

यमू : काला पहाड, जायचं नाही हं!

लुकतुके : जाऊ दे ना त्यांना!

राज : वा लुकतुके ! टेन रुपीजसाठी आमचा मोफत शो घालवता काय ?

भिकोबा : ( हत्यारांच्या पिशवीतून एक हत्यार काढून काला पहाडच्या हातात देतो. ) काला पहाड, हं, आता करा सुरुवात.

लुकतुके : ही हत्यारं भाड्यानं मिळतात का हो ? का आपली एकमेकांची उसनी घेऊन—

चाचा : शूऽऽ ! कुणी बोलू नका ! काला पहाड, करा सुरुवात—आणि थोडक्यात एक सांगतो. या तिजोरीतलं द्रव्य घेतल्यानंतर तुम्हांला एखादी नाटक कंपनी काढावीशी वाटली, तर माझं नाव लक्षात ठेवा. मी आत्तापर्यंत बत्तीस नाटकं लिहिली आहेत.

यमू : इश्श्य ! बत्तीस कुठली ? कालापर्यंत तर चौदा होती.

चाचा : काला पहाड, तुमच्या हातात पिस्तुल आहे म्हणून मला धीर आला आहे. आता सगळं सांगतो. ह्या भिक्याचा बाप–माझा मोठा भाऊ—महा अरसिक ! त्याला माझी नाट्यसेवा पसंत नव्हती. त्यानं माझी अठरा नाटकं नाहीशी केली. ती पुन्हा नजरेला पडली नाहीत. मुलांसमोर बोललो नव्हतो. पण तुम्हीच सांगा, ती नाटकं आज असती, तर मी अठरा आणि चौदा—बत्तीस नाटकांचा धनी होतो—

काला पहाड : चूप !

यमू : खामोष... खामोष म्हणा ना ! किती वेळात म्हटलं नाहीत. आणि लौकर उघडा ना तिजोरी !

काला पहाड : मी जातो.

राज : जर्मन लॉक आहे. त्याला जमणार नाही, म्हणून निघाला परत.

काला पहाड : कोण म्हणालं जमणार नाही ? आत्ता उघडून दाखवतो ! ( प्रयत्न करतो. जमत नाही. )...तुम्ही इथं असेच बसून राहिलात, तर मला काही जमणार नाही !

चाचा : मग बसल्याबसल्या मी एखादं नाटक वाचून—

लुकतुके : ( चाचांचे पाय धरतात. ) चाचा, हे दहा रुपये घ्या. पण नाटक वाचू नका. काला पहाड, इथं बसण्यापेक्षा मी बाहेर जाऊन शिक्यांना—

काला पहाड : खामोष ! ( प्रयत्न करतो. तिजोरी उघडली जात नाही. ) भिकोबा, किल्ल्या कुठं आहेत ? मुकाट्यानं आणून दे.

भिकोबा : झालं ? अहो, किल्ल्या असत्या, तर एव्हापर्यंत आम्हीच नसती का तिजोरी रिकामी केली ?

काला पहाड : म्हणजे ?

भिकोबा : बाबा गेल्यापासून किल्ल्या गायब आहेत. आम्ही टाळाचावीवाले आणले, गवंडी-सुतार आणले. पण कुण्णाला जमलं नाही ते काम.

यमू : एकदा तर शिंपीदेखील आणला होता आम्ही !

लुकतुके : कशाला ?

राज : किल्लीचं माप घ्यायला !

भिकोबा : काला पहाड, मला मात्र नेहमी वाटे, तुम्हांला बोलवावं आणि ही तिजोरी उघडून घ्यावी. पण भेटायचं तर चोरून भेटलं पाहिजे—

यमू : इश्श्य ! इतक्या वर्षांनी शेवटी आज आलात ना ?

राज : म्हणून तर तुम्हांला चहापाणी केलं ! नाहीतर चोराला कोण चहा देणार ?

काला पहाड : ये बात है ! तिजोरी उघडली, तर काय द्याल ?

लुकतुके : एक आपले दहा रुपये—

काला पहाड : दहा रुपये ? मला काय टाळाचावीवाला समजलास ? ( पिस्तुल रोखतो. )

लुकतुके : न्-नाही-नाही-ताला-पहाडसाहेब ! तुम्हांला कोण तालाचावीवाला म्हणेल ? आँ ?

भिकोबा : काला पहाड, तिजोरी उघडा. निम्मा माल तुम्हांला, निम्मा मला. काय आहे, मी बेकार आहे. हातात पैसे असले, तर... वडलांनी काय ठेवलंय्, माहीत नाही !

काला पहाड : कुणाला काही मिळणार नाही !

यमू : इश्श्य ! माझ्या लग्नासाठी तरी—

काला पहाड : खामोष !

राज : चाचा, तुम्ही सांगा ना त्याला.

चाचा : काला पहाडमहाराज ! आपण क्षणभर पिस्तुल बाजूला ठेवा. मी वचन देतो. या तिजोरीत असेल ते सगळं तुम्ही घेऊन जा. मला काडीसुद्धा नको. झालं ?

काला पहाड : ठीक आहे. सगळं मी घेणार ! रिकामा टाइम फुकट गेला ! ( खूप जोराने प्रयत्न करतो. तिजोरी उघडली जाते. सगळी आत डोकावून बघतात. )

फक्त एक बंडल आहे मोठं ! ( बंडल बाहेर काढतो. )

लुकतुके : नोटा असणार !

राज : हंड्रेडच्या !

भिकोबा : काला पहाड, यू आर ग्रेट ! मला काही थोडे—

[ काला पहाड बंडल उघडतो. आत वह्यांचा गठ्ठा ! ]

चाचा : ( उडी मारतात. ) वा वा ! कमाल झाली मोठ्या सरकारांची ! ... माझ्या नाटकांच्या वह्या ! ( वह्या बघतात. ) माझी अठरा नाटकं ! अठरा अपत्यं !! अठरा अक्षौहिणी सैन्य—

लुकतुके : पळा !

चाचा : ( एक वही उचलतात. ) काला पहाड, या प्रसंगी माझ्या ह्या नाटकाचं वाचन करू ! नाव आहे—

काला पहाड : खामोश ! मी जातो.

चाचा : खामोश ! जायचं नाही. ( लुकतुके हातात दहा रुपयांची नोट घेऊन गांगरलेले. ) लुकतुके, निघून जा. आमची आज्ञा आहे. ( लुकतुके आनंदाने पळून जातात. )

काला पहाड : पण—

चाचा : खामोश ! नाटक ऐक. नाटकाचं नाव. 'मराठ्यांची महान मर्दुमकी.' तीन अंकी ऐतिहासिक नाटक—

[ नाटक वाचायला सुरुवात करतात. काला पहाड नाइलाजानं ऐकत बसतो... क्षणभरानं भिकोबा दिव्याजवळ जाऊन दिवा बंद करतो. ]

...काळोख

# ४. रीव्हेंज

वेळ : संध्याकाळची.

स्थळ : खाजगी क्लब.

[ क्लबचा मालक विश्राम पत्ते घेऊन खेळत आहे. एकटाच. अतिशय अस्वस्थ .. पत्ते टाकतो. काही सुचत नाही म्हणून रेकॉर्ड लावतो. इंग्रजी संगीताची. टेलिफोन वाजतो. विश्राम रेकॉर्ड प्लेअर बंद करतो. ]

विश्राम : ( टेलिफोनवर ) हॅलो... मी विश्राम बोलतोय्... ऑं... हो... मी विश्राम... काही ऐकू येत नाहीय्. हॅलो... मायकेल, तूच आहेस, मला ठाऊक आहे. हॅलो .. बोल, हिंमत असेल तर बोल. हॅलो... ( काही ऐकू येत नाही. फोन रागाने आपटतो. घड्याळात बघतो. पुन्हा अस्वस्थपणे पत्ते पिसतो. पाने लावतो. फोन वाजतो. फोन घेऊन ) हॅलो... विश्राम, हिअर. येस... गो अहेऽड... मायकेल, मायकेल, बी ब्रेव्ह ! तू सुटून आल्याचं कळलंय् मला... हा हलकटपणा तुझा आहे. हॅलो... कुठून ? पब्लिक टेलिफोनवरून बोलतोस ?... काही ऐकू येत नाहीय्... नो. नो. आय ॲम् नॉट आफ्रेड .. हॅलो... यू फूल ! ( फोन आपटतो. फेऱ्या घालतो. काही तरी विचार करून फोन उचलतो. नंबर फिरवतो. ) हॅलो... पोलीस स्टेशन ? थॅंक्यू... हे पाहा, दुपारी मला फोन आला... खुनाची धमकी...

फोनमधून : खुनाची धमकी दिलीय् ?

विश्राम : हो हो. मला धमकी दिलीय्... म्हणे संध्याकाळी सहा ते सातच्या दरम्यान—

फोनमधून : किती वाजलेत ?

विश्राम : ( घड्याळात बघतो. ) सहा वाजून दहा मिनिटं झाली आहेत.

फोनमधून : आधी तुमचं नाव, पत्ता—

विश्राम : ऑं ? पण... हो... सांगतो ना. नाव विश्राम—

[ इतक्यात दाराची घंटी कर्कश वाजते. विश्राम दचकून फोन खाली टाकतो. टेबलाच्या खणातून सुरा काढून पुस्तकात लपवतो... घंटी वाजतेच आहे... सगळीकडे पाहून दाराशी जातो. दार उघडतो. दारात मायकेल उभा. ) को... कोण ? मायकेल ?

मायकेल : ( सगळीकडे पाहून ) हो... मीच. मिस्टर मायकेल डी सा!

विश्राम : कशाला आला आहेस ? ( घड्याळाकडे पाहतो. )

मायकेल : ( घड्याळाकडे पाहून ) घड्याळ बरोबर आहे ना ? ( हसतो. ) मला डाऊट होता, तू कुठंतरी रस्त्यावर भेटशील. तुझा पत्ता कधी लागत नाही. ( टेबलावर पडलेल्या पत्त्यांतून हसत हसत एक पत्ता ओढतो. ) वाः ! बदाम राजा ! !

विश्राम : ( सुऱ्याजवळ जाऊन उभा राहतो. ) केव्हा सुटलास तुरुंगातून, मायकेल ?

मायकेल : ऑं ? माहीत नाही तुला ? आज सकाळीच सुटलो. दुपारी ( फोनकडे पाहून ) आपलं बोलणं झालं, तेव्हा सांगितलं होतं मी तुला. काय-पत्ते खेळत होतास ?

विश्राम : हो.

मायकेल : धंदा जोरात आहे ना ? याने प्रायव्हेट बिझिनेस !... सट्टावेटिंग... तुझा जॉली क्लब . ( हसतो. ) ड्रिंक देणार का नाही ?

विश्राम : देईन... पण सबुरीनं !... तुरुंगात तुझे हाल झाले असतील. ( ड्रिंक न मिळाल्याने ' अशा अर्थी. )

मायकेल : नॉट ॲट ऑल... आय् वॉज हॅपी... कधी भेटायला नाही आलास मला ? ( कुत्सितपणे ) हालहवाल विचारायला ?

विश्राम : वेळ नव्हता !

मायकेल : चमेलीला वेळ होता! ती आली होती दोनचारदा! चमेली!...तुझी आणि तिची भेट?

विश्राम : नाही.

मायकेल : झूट! काल ती तुझ्याकडे आली होती.

विश्राम : असेल. मी इथं नव्हतो!

मायकेल : (हसतो.) ये बी झूट! चमेली आणि तू इथं तीनचार तास होता. तुम्ही पत्ते खेळलात ..शी अन्डं अबाऊट फिफ्टि चिप्स...अॅम् आय् राइट?

विश्राम : मे बी! तुरुंगात होतास, पण बातम्या सगळ्या.

मायकेल : आपल्या धंद्यात डोक्यापेक्षा नाक लागतं. पोलिसांचा वास आपल्याला मैलावरून येतो. (बदाम राणीकडे पाहात) चमेलीला मॅरेजचं प्रॉमिस दिलं होतंस, त्याचं काय झालं? (पत्ता दाखवतो.)

विश्राम : विचार करतोय्!

मायकेल : लौकर विचार कर... मला टाइम नाही फार!

विश्राम : तुझा संबंध?

मायकेल : (आपल्या खिशातून पत्ता काढतो.) नेमका बदाम राजा!! (हसतो.) तू केलं नाहीस, तर मी करणार आहे.

विश्राम : चमेलीशी?

मायकेल : येस्, तिची पोरगी तिच्याकडे नसते हल्ली. नाही तर त्या पोरीशीच केलं असतं... नाव काय रे तिचं?

विश्राम : जयश्री! ती कुठं असते?

मायकेल : तिनं धरला यल्लाप्पाचा हात आणि गेली पळून. यल्लाप्पा माहीत आहे ना? त्याचासुद्धा आपल्यासारखाच बिझिनेस आहे. सट्टाबेटिंग, क्लब, साइडला स्मगलिंग. (घड्याळाकडे पाहतो.) घड्याळं म्हणू नकोस —

विश्राम : (मायकेलने घड्याळाकडे पाहिले हे लक्षात येऊन दचकतो. विषय बदलण्यासाठी) खूप पैसा कमवत असेल त्याचा क्लब?

मायकेल : (घड्याळाकडे टक लावून पाहात) विश्राम, यार, टाइम थोडा आहे नाही आपल्याला? डोन्ट चेंज द सब्जेक्ट! चमेलीचं काय ठरवलं आहे?

विश्राम : एकदा सांगितलं ना—अजून ठरवलं नाही.

मायकेल : तिच्या नवऱ्याला मारायचं मात्र लगेच ठरवलं होतंस.

विश्राम : स्टॉप इट् ! ती तुझीच आयडिया. पॉयझन दिलंस त्याला ड्रिंकमधून.

मायकेल : तुझा काहीच हात नव्हता त्यात ? ( हसत ) त्या ड्रिंकमध्ये सोडा होता तो तुझ्याच आयडियाचा.

विश्राम : माझी आयडिया ? ( गप्प राहतो ... ) ... नो... ॲब्सोल्यूटली नॉट... मुळीच नाही...

मायकेल : मग पाच हजार रुपये कसले दिलेस मला ? कंपौंडरची नोकरी सोडायला की क्लब खोलायला ?

विश्राम : माहीत नाही !

मायकेल : माहीत नाही ? मग ऐक. ( पत्ते पिसता पिसता गोष्ट सांगावी तसे — ) हो... चमेलीच्या नवऱ्याचं नाव होतं भगवानदास. ( पाने टाकत ) सारखा प्यायचा ... विड्या ओढायचा . खोकायचा ... तू चमेलीकडे जायला लागलास— ( सिगारेट काढून पेटवतो. )

विश्राम : ( चिडून ) तुला झाली इतकी शिक्षा पुरी नाही झाली ?

मायकेल : ( हसतो. ) बेटा, सजा झाली ती दुसऱ्या लफड्याबद्दल ... या तुझ्या लफड्याची सजा ... काय रे, पोलीसला मी हे सगळं सांगितलं, तर काय होईल, यार ? तुला आणि मला दोघांना—कमसे कम काळं पाणी तरी शुअर !

विश्राम : आता काय पाहिजे तुला ? तेव्हा पाच हजार रुपये घेतलेस . मग एकदा एक हजार...पुन्हा दोनतीन वेळा पाचशे ... तू ब्लॅकमेलिंग करतोयस् ... ! यू रास्कल —

मायकेल : ( खिशाला हात लावतो. ) जपून बोल... खिसा भरलेला आहे. ( विश्राम एकदा टेलिफोनकडे आणि एकदा घड्याळाकडे पाहतो. ) पॉयझन नाही यूज करत मी, आजकाल रिव्हॉल्वर ! तुझी कृपा !

विश्राम : आय् नो इट् !

मायकेल : ( हसतो. घड्याळाकडे पाहतो. सहज फोनकडे जाऊन त्यावरून हात फिरवतो. ) टाइम आहे अजून थोडासा. मग रिव्हॉल्वरच्या गोष्टी करू ! त्याच्या आधीं थोडे पैसे... विश्राम, जरा पत्ते खेळायचे का ? ( पाने पिसतो. ) फाइव्ह रुपीज अ पॉइंट ! पॅक् माझा... तुझ्या जॉली क्लबचे खोटे पत्ते नकोत. ( पत्ते पिसून वाटतो. ) आर यू रेडी ?

विश्राम : नो !

मायकेल : कम् ऑन ! आखरी डाव. जरा वेळ खेळू.
विश्राम : जरा वेळ ? ( घड्याळात पाहतो. मग फोनकडे )
मायकेल : हो ... सात ... फक्त सात वाजेपर्यंत खेळू. पैसे आहेत ना ?
विश्राम : मी खेळणार नाही ! हवे असतील तर शंभर एक रुपये घेऊन जा—
मायकेल : जा. ( हसतो. ) सात वाजेपर्यंत मी जाणार नाही. ( विश्राम संशयानं पाहतो. ) ...आपण वाटल्यास बोलत बसू. चमेलीबद्दल बोलायचं ?
विश्राम : नाही !
मायकेल : हॅं. मग भगवानदासबद्दल बोलू. त्याच्या मर्डरबद्दल ... तुझी आयडिया, माझं औषध, तुझा सोडा, माझं ड्रिंक प्लस पॉयझन्.
विश्राम : शट् अप् !
मायकेल : तुला काय वाटतं ? तुझ्या–माझ्याशिवाय कुणाला माहीत नाही भगवानदासच्या मर्डरबद्दल ?
विश्राम : ( दचकतो. ) कुणाला माहीत आहे ? ... मायकेल, तूच चमेलीला हे सांगितलं आहेस ? तिच्याशी तुझे संबंध—
मायकेल : मी कुठं नाही म्हणतो ? तुझे आहेत तसेच आहेत... अरे हो, तुं आता चमेलीशी—
विश्राम : शरम नाही वाटत ? मित्राच्या बाईबरोबर—
मायकेल : ( कुत्सितपणे ) भगवानदास तुझा मित्रच होता ! त्याच्याकडे तू जायचास, तेव्हा त्याच्या बाईबरोबर–भगवानदासला त्यासाठीच तू मारलंस.
विश्राम : त्याला मी विष दिलं, की तू ?
मायकेल : ऑफ कोर्स ! मी दिलं पॉयझन्... त्याबद्दल तू पैसे दिलेस ! अर्धा गुन्हा विकत घेतलास. पॉवरबॉज आणि डरपोक. तू आमनेसामने नाही लढणार ! चोरून. फोनवरून ... ( फोनकडे बघतो. ) साला, तू मलादेखील असा डाव टाकून मारशील. भगवानदासचा मर्डर—
विश्राम : ( एकदम ) त्याच्या मर्डरबद्दल कुणाला माहीत आहे ? बोल आधी... चमेलीला ? तू सांगितलंस तिला ?
मायकेल : अंहं ! तिच्याशी बोलणं होत नाही फारसं माझं ! बोलायचं, पत्ते खेळायचे हे काम तुझं. आपण एकदम–विश्राम, मी चमेलीशी मॅरेज करतोय–स्ट्रेट !

विश्राम : ते मी ठरवीन ! ...मर्डरबद्दल कुणाला माहीत आहे, ते सांग.

मायकेल : सांगू ? बेटर, यू गेस !

विश्राम : लौकर सांग.

मायकेल : मला आपला एक डाऊट आहे !

विश्राम : कुणाचा ?

मायकेल : जयश्रीचा ! तिला कळलंच बहुतेक.

विश्राम : जयश्रीला ?

मायकेल : ती काय लहान आहे आता ? यल्लाप्पासारख्या गुंडाचा हात धरून पळाली म्हणजे वत्र—

विश्राम : तिला कुणी सांगितलं ?

मायकेल : तू सांगितलं असशील !

विश्राम : मी ?

मायकेल : तुझा भरोसा काय ? तू सांगितलं असशील, मायकेलनं पॉयझन दिलं म्हणून ! म्हणजे माझा परस्पर काटा निघेल—

विश्राम : आर यू शुअर ? जयश्रीला माहीत आहे ? म्हणजे ती—

मायकेल : येस ... ती रीव्हेंज घेणार ! बापावर फार जीव होता पोरीचा. भगवानदास गेल्यावर कशी छाती फाडून रडली... पाहिलंस ना ? तेव्हा-पासून तिला दोघांचा डाऊट आहे.

विश्राम : दोघांचा म्हणजे ?

मायकेल : विश्रामचा आणि मायकेलचा ! समदे गद्धे ! ... चमेलीला ती पोरगी म्हणायची–बापाच्या मर्डरचा सूड घेईन म्हणून !

विश्राम : सूड म्हणजे काय करणार ती पोरटी ?

मायकेल : फुक्कट धंदे करतोस हे ! तू खोट्या पत्त्यांनी खेळतोस ना, ती पण तशीच खेळेल. दाखवायचा पत्ता एक, खेळायचा पत्ता दुसरा ! तिनं यल्लाप्पाला–त्या गुंडाला–काय उगाच जवळ केलंय् ? त्याच्याकडून वचन घेतलंय् तिनं रीव्हेंजचं... त्यानं वचन दिलं म्हणून ती गेली त्याच्याबरोबर. नाही तर आहे काय त्याच्याजवळ ? तिच्याहून वयानं मोठा...हा...पण तो साला जिगरवाला आहे. साफ मुडदा पाडील आपला ... एकदम जिगरवाला. आणि भेजा पण आहे त्याला.

विश्राम : ( आपली भीती दडवून मायकेललासुद्धा घाबरवण्यासाठी हसतो. ) आता साली भानगड झाली.

मायकेल : कसली ?

विश्राम : तू माझ्याकडून पैसे मागतोस—म्हणजे ब्लॅकमेलिंग नंबर वन. आता यल्लाप्पा तुझ्याकडून आणि माझ्याकडून पैसे मागणार—म्हणजे ब्लॅकमेलिंग नंबर टू अँड थ्री ! ( खोटे हसतो. )

मायकेल : यल्लाप्पा पैसे मागणार ? मूर्ख आहेस ! तो जीव घेईल दोघांचा. तुझा आणि माझा. हा रीव्हेंज आहे यार. पैशाचा सवाल नाही इथं.

विश्राम : ( गंभीरपणे विचार करतो. ) मग—

मायकेल : ( चुटकी वाजवतो. ) त्यालाच मारायची आयडिया काढ एखादी... गरम सोडा... हां, पण आता मी कंपौंडर नाही डॉक्टर शेखचा. ( विश्राम विचारात पडतो. ) डरो मत यार... पॉयझन इझिली मिळेल. किती अमाऊंट देणार ? धिस टाईम टेन थाऊजंड ?

विश्राम : पैसा खतम आहे !

मायकेल : इतका पैसा मिळवतोस तो उडतो कुठं ? चमेली तर म्हणत होती, तू तिला पैसे देत नाहीस म्हणून !

विश्राम : तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नकोस. ती... यू नो हर बेटर !

मायकेल : ऑफ कोर्स ! मॅरेज करतोय् ना मी तिच्याशी ?

विश्राम : मी रिफ्यूज केलं, तरच !

मायकेल : तू म्हणालास तरी ती हो म्हणेल. आमचं ठरलंय सगळं... मॅरेजला पैसे हवेत, पण मिळतील... यल्लाप्पाच्या मर्डरचं सांग. दहा—

विश्राम : नो !

मायकेल : देन् डाय—यू फूल !

विश्राम : तुला दहा हजार देण्यापेक्षा मी स्वतःच जाऊन—

मायकेल : तू ? ( हसतो. ) तू डरपोक नंबर वन्...! शिवाय, तुझी स्वतःची ही आयडिया मी कुठं सांगू नये म्हणून तोंड बंद करण्यासाठी मला हजार, दोन हजार— ( हसतो ) डरपोक नंबर—

विश्राम : मी डरपोक ?

मायकेल : ( हसतो. ) साला मी आलो तेव्हा तू किती घाबरलास ! तुरुंगातून मी तुझा

मित्र सुटून आलो हे कळल्यावरच तू घाबरलास! पत्ते खेळू म्हटलं, घाबरलास!!

विश्राम : ठीक आहे. खेळू पत्ते .. टेन स्पीज अ पॉइंट! (टेबलावरले पत्ते घेऊन पिसतो.)

मायकेल : नो. नो.... पॅक माझा... किती वेळ खेळायचं? (घड्याळाकडे पाहतो.) अप टू सेव्हन.

विश्राम : (खोकून विचारतो.) सेव्हन काय! (स्वतःशी) सहा ते सातच्या दरम्यान...

मायकेल : काय?

विश्राम : काही नाही! म्हटलं, सातनंतर तुला अपॉईंटमेंट आहे?

मायकेल : हां... पोलीस चौकीवर जायचंय्.

विश्राम : (चपापून) कशाला?

मायकेल : रिपोर्ट द्यायला... सातपर्यंत इथं जरा गंमत... मग पळायचं–(हसतो.)

विश्राम : (एकदम) मायकेल! इथं कशाला आला आहेस, बोल.

मायकेल : (गळ्यावरून सुरी फिरवल्यासारखा अभिनय करतो.) तुला काटायला! (हसतो.) पैसे हवेत ना मला!... खरं तर मी तुझीच वाट पाहात थांबणार होतो घरी, पण—

विश्राम : माझी वाट? इंपॉसिबल? मी तुझ्याकडे येणार? बेवकूफ! मीच तुझी वाट पाहात इथं थांबलो होतो.

मायकेल : (खोचून) सहा ते सात.

विश्राम : (दरडावत) हो, हो, सहा ते सात.

मायकेल : सोबतीसाठी चमेलीला, जयश्रीला नाही तर यल्लाप्पाला नाही ठेवायचं इथं?... म्हणे वाट बघतोय्... सकाळी सुटून आलो तेव्हा भेटायचंस. हॅ : गरज संपली की माणूस खलास! भगवानदासला मारताना दहा चकरा माझ्याकडे— रिझल्ट काय! मी कंपौंडरची नौकरी सोडली, तुझ्या धंद्यात शिरलो. मग तुरुंगाची हवा खाल्ली. तुरुंगात विचार केला हे कशासाठी? विश्रामला चमेली मिळावी म्हणून मी तुरुंगात जायचं. शिक्षा भोगली त्याचं बक्षीस मलाच का नको? चमेली आता माझी होणार— मॅरेज झालं की तुला लाथ मारणार मी... आमच्या घरी तू यायचं नाहीस. चमेलीशी बोलायचं नाही... गेट आऊट!

विश्राम : मायकेल, सोपं नाही हे.

मायकेल : एकदम सोपं आहे... भगवानदासला मारण्यापेक्षा सोपं... तुरुंगातून सुटलो तो तडक चमेलीकडे गेलो. खूप दिवसांची कडकडीत भूक लागली.

विश्राम : बेवकूफ !

मायकेल : ( तिकडे लक्ष न देता ) .. चमेलीनं कोंबडी केली होती. एकदम झगझगीत... कोंबडी खातानाच विचारलं, मॅरेज करणार का म्हणून !

विश्राम : ( कुत्सितपणे ) कुणाला ? चमेलीला ?

मायकेल : ( त्याच सुरात ) नाही, कोंबडीला ! समझे ? ( हसतो. ) कोंबडी लगेच कबूल... तसाच धावत गेलो माझ्या जुन्या क्लबवर... म्हटलं, आज लक आहे. आजच्या आज सगळं लफडं कंप्लीट मिटवून—

विश्राम : ( कोरडेपणाने ) मायकेल, दुपारी मला फोन आला होता.

मायकेल : फोन ? ( हसतो ) साला तू डरपोक पण आयडियावाला आहेस बब ! दाखवशील एक पत्ता, खेळशील दुसराच.

विश्राम : मी नाही खेळत असले डाव ! मी फक्त सुचवतो, तुझ्यासारखी माणसं पानं टाकतात.

मायकेल : आणि पानं टाकल्याचे पैसे त्यांनी मागितले, की तू दुसरा डाव टाकतोस— त्याचा काटा काढण्याचा ! ( एकदम ) विश्राम, दुपारी मलासुद्धा फोन आला होता. ( विश्राम चमकतो ) हो .. फो–न ! ( घड्याळात बघून ) बिटविन् सिक्स अँड सेव्हन... सहा आणि सातच्या दरम्यान—

विश्राम : ( त्याला अडवून कुत्सितपणं हसत ) बब, नुसत्या इशाऱ्यावर पान टाकलंस !

मायकेल : पान टाकलं ना ? आता पाचशे रुपये काढ—

विश्राम : यापुढे एक पैसादेखील मिळणार नाही तुला.

मायकेल : पोलिसला सांगितलं तर ?

विश्राम : पुन्हा याद आलीय् ?— तुरुंगात जायची ?

मायकेल : ( हसतो ) यार, तुरुंगात तुझी फार याद यायची. आता पुन्हा जायचं असेल तुरुंगात, तर तुला संगती घेऊनच जायचं, बस्स ! विश्राम, गप्पा नकोत. एकच सांग. पोलिसला सांगू की यल्लाप्पाला सांगू ?— नुसता फोन करायची खोटी—

विश्राम : फोन आणि फोन ! हरामखोर ! तोंडावर बोलायची हिंमत नाही म्हणून फोन करतोस काय ?

मायकेल : वाः क्या बात है ! तू–विश्राम, तूच मला फोन करून बिटविन् सिक्स अँड सेव्हन—

विश्राम : मी ? फोन मी केला की तू केलास ? मायकेल, तूच म्हणालास बिटविन् सिक्स अँड सेव्हन ! बेवकूफ, काय करायचं ठरवलं आहेस ?

मायकेल : मी कोण ठरवणार ? ठरवतोस तू आणि करतो मी ! विश्राम, तूच सांग– तू काय ठरवलं आहेस ?

विश्राम : नंबर एक–तुला पैसा देणार नाही. नंबर दोन–चमेलीशी तुला लग्न करायला देणार नाही.

मायकेल : आता मी नंबर सांगतो माझे. ( हसतो ) नंबर वन्— पोलिसला नाही तर यल्लाप्पाला सांगायचं. नंबर टू– चमेलीशी मॅरेज... खिशात रिव्हॉल्वर घेऊन आलोय्. फोनवर सांगतोय काय ?– बिटविन् सिक्स—

विश्राम : ( संतापून ) मायकेल, ( एकेका शब्दावर जोर देत ) मी– तुला–फोन केला–नाही ! तूच फोन केलास ... तूच !

मायकेल : ( कुत्सितपणे हसतो ) मी फोन करणार ? हॅ : रिव्हॉल्वर घेऊन सरळ सामने जाणारा माणूस आहे मी ... तुझी वाट पाहात बसलो नाही क्लबवर. सीधा तुझ्याकडे आलो. फोन करून मग इथं सडून बसतोस तू ! डरपोक कहीं का !

विश्राम : झूठ ! मायकेल. तू फोन केलास ... मघाशी इथं यायच्या आधी–बेवकूफ, तुला फोनवर मी बोललो देखील– ' मायकेल, बी ब्रेव्ह. ' नाव का नाही मग सांगितलंस तेव्हा ? आवाज बदलून बोलतोस काय पोरीसारखा ?

मायकेल : सूवर ! तूच आवाज बदलतोस ! धमकी देतोस मला फोनवर ... पहिले सुन ! ( एकेका शब्दावर जोर देत ) तू फोन केलास. तेव्हा मी तुला फोनवरच बोललो–' विश्राम, रीव्हेंज घेऊ नकोस. तुला महागात पडेल ! '

विश्राम : आणखी नाही का काही सांगितलंस ? साल्या, तुझी दातखीळ बसली होती बोलताना ! तुरुंगात जाऊन आलास, पण हिंमत नाही कमावलीस नुसती धमकी देऊन चूप बसलास–पोरीसारखा ! चलो ... तुझ्यासमोर उभा आहे मी. दाखव हिंमत.

मायकेल : जाने दो यार...आपण पत्ते खेळू या. तीन पान.

विश्राम : नथिंग डुइंग! बी ब्रेव्ह, मायकेल.

मायकेल : ओ. के. पहिले कबूल कर. फोन तू केलास म्हणून. मी सुटून आलो म्हणून बावरला आहेस तू!

विश्राम : सॉरी! ... मायकेल, आखरी सांगतो. मी फोन केला नाही. तू केलास!

मायकेल : खात्री आहे तुझी?

विश्राम : वनफिफ्टी परसेंट.. वेळ थोडा आहे...माझं ऐक. इथं यायचं नाही कधी...चमेलीशी संबंध सोडायचा.

मायकेल : (बेमुर्वतपणे) अंहः! चमेली माझी आहे. तू तिला भेटायचं नाहीस ...पाचशे रुपये दे आणि झगडा मिटव. तू मोकळा, मी मोकळा.

विश्राम : यल्लाप्पाचं काय? त्याला इन्फर्मेशन आहे.

मायकेल : त्याचा काटा तू काढ. तो भारी आहे हं...तुझ्यापेक्षा आयडियावाला ...मान कापली तर कळणार नाही! असा फोनबिनवर बोलणार नाही. सिध्धा रिव्हॉल्वर! ...जाने दो...कम ऑन्...आऊट विथ फाइव्ह हंड्रेड! ...का किंग-स्केल करतोस? किंग आला तर तुझी (खिशातून नाणे काढतो, उडवतो) बघ... किंग आला. (नाणे उचलू लागतो.)

विश्राम : (बाजूचा सुरा घेतो.) हँड्स् अप, मायकेल!

मायकेल : (खिशातून रिव्हॉल्वर काढतो) हे पाहिलंस? मी सारखे पैसे मागतो म्हणून मला मारण्याची आयडिया करतोयस्? मी सुटल्याचं समजलं तशी लगेच फोन केलास! माझं आणि चमेलीचं मॅरेज होईपर्यंत तरी वाट बघायची—

विश्राम : चमेलीशी लग्न करायचं म्हणूनच फोन केलास तू! तुरुंगातून सुटल्या-बरोबर.. मला मारण्याचा तुझा विचार आहे-! बेव... (फोन वाजतो) मी फोन घेऊ, की तू घेतोस?

मायकेल : गो अहेऽड! (विश्राम फोनकडे जाताना लक्ष ठेवतो.)

विश्राम : (फोन घेतो. फोनवर) हॅलो.. विश्राम हिअर...हॅलो...हॅलो...

मायकेल : कुणाचा फोन आहे?

विश्राम : काही कळत नाहीय्. ऐकूच येत नाहीय् काही.

मायकेल : मी घेऊ फोन ?

विश्राम : खुश्शाल !

मायकेल : ( फोनजवळ येतो. फोन घेतो ) हॅलो ... हॅलो ... पोलिस डिपार्टमेंट ? ( फोनवर हात ठेवतो ) विश्राम, पोलिसचा फोन आहे. बोलणार ?

विश्राम : शू ऽऽ डिस्कनेक्ट कर. ( मायकेल फोन खाली ठेवतो. ) थँक्यू ...

मायकेल : तू पोलिसला कळवलं आहेस ? — बोल –

विश्राम : अं ? ... प्रयत्न करत होतो, इतक्यात तू आलास.

मायकेल : अच्छा ! मग आत्ता का नाही बोललास पोलिसांशी ?

विश्राम : आता गरज नाही. तूच आला आहेस समोर !

मायकेल : म्हणजे ?

विश्राम : मी कंप्लेंट करत होतो पोलिसला. तुझ्या धमकीबद्दल ... फोनवर तू धमकी—

मायकेल : डोन्ट वरी ! पोलिस माझ्या मागावर असतीलच ... त्यांना माहीत आहे, फोन मी केलेला नाही म्हणून ! ( हसतो. ) विश्राम, पोलिसचा फोन म्हटल्यावर हिंमत पॅक करून तू पानं टाकलीस खाली ! ( हसतो. ) तो पोलिसचा फोन नव्हताच !

विश्राम : पोलिसचा नव्हता ? मग कुणाचा होता ?

मायकेल : मला काय माहीत ? कुणीच बोलत नव्हतं पलीकडून ... हां, फोन चमेलीचा असेल, नाही तर यल्लाप्पाचा असेल –

विश्राम : यल्लापाचा काय संबंध ?

मायकेल : त्याच्या सासऱ्याचा – भगवानदासचा तू मर्डर केला आहेस ना ? आता जयश्रीला खूश करायला रीव्हेंज घ्यायचा असेल यल्लाप्पाला !

विश्राम : माझा एकट्याचा ? आणि तू सुटणार आहेस त्यातून ?

मायकेल : चमेलीशी मॅरेज केलं, की मी सुटेन ! ( हसतो. ) मीच होणार मग यल्लाप्पाचा सासरा ! साली, आम्हांला पण आयडिया येते... म्हणजे किती ईझी बघ ! तू खतम, चमेली बायको, यल्लाप्पासारखा दादा माझा जावई ... ( हसतो. )

विश्राम : हसू नकोस ! आता एक शब्द जरी बोललास, तर– ( फोन वाजतो. ) तूच घे फोन !

मायकेल : ( हसत ) ...बोलायला परमिशन आहे ना ? ( विश्राम मान डोलावतो. ) हॅलो ...मी विश्राम बोलतोय्...जॉली क्लब ..ऑं ? ... ( हसतो ) धावा हं...काय ? भगवानदासबद्दल ?...वेट अ मिनिट ! विश्राम, तूच सांग ...तुला मर्डरबद्दल आख्खी बातमी आहे.

विश्राम : कोण बोलतंय् ?

मायकेल : पोलिस, चमेली, जयश्री नाही तर यल्लाप्पा... ( खोचून ) मी नाही हं...मी तर इथंच आहे...हं, बोलतोस ना ?

विश्राम : नको.

मायकेल : वेड्या, नाही तर लाईनच कापून टाक ना ! हातात सुरा आहेच–

विश्राम : तो तुझ्यासाठी आहे.

मायकेल : ( तिकडे लक्ष न देता ) किती वाजले रे ?

विश्राम : डोन्ट आस्क मी !

मायकेल : हं, फोन घे–

विश्राम : डिस्कनेक्ट कर– आधी ! ( मायकेल फोन ठेवण्यासाठी वळतो ...विश्राम त्याच्या पाठीत सुरा मारतो. मायकेल खाली कोसळतो. ) आता कर चमेलीशी लग्न ! पैसे हवेत ? फाईव्ह हंड्रेड ? यल्लाप्पाला मारायला टेन थाउजंड काय ? म्हणे, यल्लाप्पा रीव्हेंज घेणार ! ( फोन वाजतो. विश्राम फोन घेतो. ) हॅलो . विश्राम...कोण बोलतंय् ?

फोनमधून : ( हसणं ) पोलिस डिपार्टमेंट ! मायकेल आहे तिथं ?

विश्राम : मायकेल ?...न्...नाही.

फोनमधून : त्याच्यामागं माणूस होता आमचा. मायकेल तुझ्याकडेच आलाय्. तिथून बाहेर पडलेला नाही अजून...

विश्राम : मला काही माहीत नाही !

फोनमधून : ठीक आहे. मी स्वतः येऊन बघतो. येऊ का ?

विश्राम : ऑं ?

फोनमधून : तुला यल्लाप्पा माहीत आहे ?

विश्राम : अं ?...हो...ना...नाही...मला माहीत नाही तो !

फोनमधून : अच्छा ! मग ऐक. मीच यल्लाप्पा ! मी तुम्हांला दोघांना फोन केले...( हसणं ) मायकेलला मारलंस ना तू ? छान...थँक्यू...आयडिया

आवडली! आता उद्या तुझा नंबर! बिट्विन् सिक्स अँड... छे: लौकरच आटपू... बिट्विन् सिक्स थर्टी !...जयश्री खूश होईल एकदम...तिच्याजवळ कसम खाल्ली होती मी... बाय् बाय्—उद्या...

[ विश्रामच्या हातून फोन गळून पडतो नुसता लोंबत राहतो ]

बिट्विन् सिक्स अँड सिक्स थर्टी... बिट्विन्...

(पडदा.)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २०००३ नों. दि २८।१०।८३
वि. आटवा मो. ..................

IRBK-0120003